**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८८

निर्णय दिनांक : ०१.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. भागवत विठ्ठलराव शेरे,<br>रा. सोयगाव, जि.औरंगाबाद. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जि.औरंगाबाद | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जि.औरंगाबाद | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे आयोगाच्या कार्यालयात दि. २५.०५.२०१० रोजी दाखल केलेले निवेदन आयोगास सादर करण्यात आले असून, यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ९८८/०९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. ९८८/०९, दि. २५.०५.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भागवत विठ्ठलराव शेरे,रा. सोयगाव, (शिवाजीनगर), जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८९

निर्णय दिनांक : ०१.०६.२०१०

१. श्री. रेवणसिध्द गुलाब बडदाळे, : अपिलार्थी
रा.मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लेखापाल,
नगर परिषद कार्यालय, मुरुम,
ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद कार्यालय, मुरुम यांच्याकडे मुरुम नगर परिषदेमार्फत होणाऱ्या विविध कामकाजासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मुरुम नगर परिषदेच्या हद्दीतील सोनारगल्ली ते गांधी चौक रस्ता व

गटारीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची प्रत, गांधी चौक ते किसान चौक व सईदा गल्ली ते किसान चौक रस्ता व गटारीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची प्रत आणि सन २००८-०९ या कालावधीमध्ये देण्यात आलेल्या नळ पुनर्जोडणीची संख्या व रोड खोदाई रक्कम कोणाकडून व किती वसूल झाली याची यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम यांच्याकडे दि.२८.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी हे दंडात्मक कारवाईस पात्र असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही आदेश प्राप्त न झाल्याने व अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(१) मधील विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे द्यावी लागेल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे

अर्जदाराचे उत्तरदायित्त्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले, याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही किंवा यासंदर्भात मौखिक युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, मुरुम यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या रस्त्याचे बांधकाम निकृष्ट असल्याचा उल्लेख केला आहे.यासंदर्भात संचालनालय, नगर परिषद प्रशासन हे वेगळे सक्षम प्राधिकरण अस्तित्त्वात असल्यामुळे अपिलार्थीने या रस्त्याच्या दर्जाविषयीच्या त्यांच्या आक्षेपांचा निपटारा संचालनालय, नगर पालिका प्रशासन, मुंबई यांच्याकडे स्वतंत्र अर्जाद्वारे करुन घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०१.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द गुलाब बडदाळे,सोनार गल्ली, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,नगर परिषद कार्यालय, मुरुम,ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, मुरुम,ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९०

निर्णय दिनांक : ०१.०६.२०१०

१. श्री. आंबादास बाळासाहेब वऱ्हाडे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत चिखली,ता. जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती देण्यास टाळाटाळ केली. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या ग्रामपंचायतीमधील विविध योजनेअंतर्गत झालेल्या विकास कामाच्या

संदर्भात सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण १८ वेगवेगळया मुद्यांद्वारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे त्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीकडून ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याची खात्री जन माहिती अधिकारी यांनी करुन घेऊन, नंतर अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वेगवेगळया ग्रामपंचायत कार्यालयांकडे अशाच प्रकारची विस्तृत व्याप्ती असलेली माहिती कायम मागवत असतात व संबंधित सरकारी कर्मचाऱ्यास ब्लॅकमेल करीत असतात व त्यांच्याकडे अशाप्रकारच्या माहितीकरिता पैशांची मागणी करीत असतात. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांच्याकडे सादर केल्यास ते ही

माहिती अपिलार्थीस त्वरित देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली विस्तृत स्वरुपाची माहिती, दुसऱ्या एका अर्जदाराने त्यांच्याकडून स्वतंत्र अर्जाद्वारे सशुल्क प्राप्त करुन घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यास त्यांना कोणतीही अडचण येणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्याकडे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा सबळ पुरावा सादर न केल्यामुळे ते अद्यापपावेतो अपिलार्थीस सदर माहिती विनामूल्य पुरवू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ मध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविताना अर्जदाराने करावयाच्या अर्जाचा नमुना जोडला आहे. त्यामध्ये दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडण्याच्या सूचना आहेत. त्यामुळे दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना त्यांचा दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या रेशन कार्डाची झेरॉक्स प्रत त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडली आहे. तथापि या प्रतीवरुन अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दि. ०७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे योग्य तो प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे जन

माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. अपिलार्थीस ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर करण्याचे, जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये असा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी पाहून नंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले असूनही अपिलार्थीने त्यांच्या दारिद्रयरेषेच्या प्रमाणपत्राबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सबळ पुरावा सादर केला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी हे त्यांना सशुल्क उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस जर या माहितीची अद्यापही आवश्यकता असेल तर त्यांनी एकतर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावा. सदर पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर पुराव्याच्या वैधतेबाबत खात्री करुन घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी अन्यथा अपिलार्थीस याच कालावधीमध्ये सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती संधी देऊनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर न केल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वत:च जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे व माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली केल्याचे आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीने ज्या कारणास्तव आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे ती कारणे अशाप्रकारे निकाली निघत असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आंबादास बाळासाहेब वऱ्हाडे,वेताळनगर,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत चिखली,ता. जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९१

निर्णय दिनांक : ०१.०६.२०१०

१. श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग शिंदे, : अपिलार्थी
रा.वाळुज,ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वाळुज,ता.गंगापूर,
जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती गंगापूर,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत,वाळुज यांनी घेण्यास नकार दिला व यावर त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी देखील अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज स्वीकारण्याचे नाकारल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत वाळुज यांच्याकडे, त्यांच्या ग्रामपंचायतीसंदर्भात सन २००६ ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे मोठे होते. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज स्वीकारण्याचे तत्कालीन ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, वाळुज यांनी नाकारल्याने अपिलार्थीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारचा नकारात्मक प्रतिसाद प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस या माहितीशी संबंधित अभिलेखे दि. १४.०७.२००९ रोजी वाळुज येथे तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले. सदर माहती अपिलार्थीने तपासून, त्यांनी माहिती अधिकाराखाली मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याबाबत त्यांना लेखी जबाब दिलेला आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीचे दि. १०.०७.२००९ रोजीच्या लेखी जबाबाची सत्यप्रत आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तपासणीसाठी दि. १४.०७.२००९ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती तपासून अपिलार्थीचे समाधान झाले आहे व या संदर्भात अपिलार्थीने त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना लेखी पत्र दिले आहे. हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज तत्कालीन ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, वाळुज यांनी स्वीकारला नसल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला असून या पुराव्यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, वाळुज श्री. बी.जी. शिरसाट यांनी दि. २४.०३.२००९ रोजी अपिलार्थीचा अर्ज स्वीकारण्याचे नाकारल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने केलेला अर्ज स्वीकारण्याचे नाकारुन श्री. शिरसाट यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना तत्कालीन ग्राम विकास अधिकारी, श्री. बी.जी.शिरसाट यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीमध्ये आयोगास अपिलार्थीचा दि. १०.०७.२००९ रोजीचा कबूली जबाब चुकीच्या पध्दतीने सादर केला असल्यामुळे सध्या कार्यरत असलेले ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत,वाळुज ता.गंगापूर,श्री. एम.एल.चव्हाण यांच्यावरही प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

त्याचबरोबर अपिलार्थीचे दि. ३१.०३.२००९ रोजीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत, वाळुज, श्री. बी.जी.शिरसाट व सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत,वाळुज, श्री. एम.एल.चव्हाण या दोघांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०१.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग शिंदे,मु. पो. साठेनगर,वाळुज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, वाळुज, ता. गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती गंगापूर,

जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९२

निर्णय दिनांक : ०१.०६.२०१०

१. श्री. झाबु गबु राठोड, : अपिलार्थी
रा. बाजी उमरद, ता.जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मर्यादित, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मर्यादित, मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मर्यादित, जालना यांच्याकडे महामंडळाने एन.बी.सी. व एफ.डी.सी. या योजनेअंतर्गत दि.०५.०५.२००६ ते ११.१२.२००८ या कालावधीतील मंजूर झालेल्या सर्व प्रकरणाच्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींची व थेट कर्ज योजनेअंतर्गत दि. ०५.०५.२००६ ते ११.१२.२००८ या कालावधीतील मंजूर

झालेल्या संपूर्ण लाभार्थ्यांच्या प्रकरणाच्या झेरॉक्स प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती न पुरविली गेल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असून ही माहिती त्यांना अद्यापपावेतो वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मर्यादित,जालना कार्यालयातून प्राप्त झालेली नाही. व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कधी गेले होते, यासंदर्भात पुरावा आयोगाने मागितला असता, त्यांना यासंदर्भात काहीही समजत नाही, असे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम व अपिलार्थीने केलेला युक्तिवाद पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे द्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व यासंदर्भात बाजीउम्रद/तांडा या ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही

माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०१.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. झाबु गबु राठोड,रा. बाजी उमरद, ता.जि.जालना

२. जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मर्यादित, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मर्यादित,जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड ९,विलेपार्ले (प.) मुंबई -४९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९३

निर्णय दिनांक : ०१.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुहास किसनराव देशमुख व<br>श्री. वसंत निशिकांतराव मसलेकर,<br>रा.माजलगाव, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,माजलगाव,<br>जि. बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,<br>जि.बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि या अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे व दोषी माहिती अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बीड जिल्हयातील नित्रुड ते तेलगाव या गावाच्या दरम्यान होत असलेल्या रस्त्याच्या साईडपट्टीच्या कामासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रस्त्याच्या कामाच्या अंदाजपत्रकाची प्रमाणित प्रत, निविदा दिलेल्या वर्तमानपत्राची प्रत, सदर काम नियमास अनुसरुन आहे काय? माजलगाव ते तेलगाव हा रस्ता डांबरीकरण करुन काही महिने झाले, त्यात बरेच खड्डे पडले आहेत, ते खड्डे संबंधितांकडून भरुन घेणार काय? व तेलगाव ते माजलगाव या रस्त्याच्या पॅचवर्कचे काम संबंधित कंत्राटदाराकडून करुन घेणार काय? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २५.०५.२०१० रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे.यापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती व माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची

पोचसही आयोगास सादर केली आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, ते जन माहिती अधिकारी आता बदलून गेले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे नाव श्री. बी.डी.साळवे असे आहे.

वरील घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील नित्रुड ते तेलगाव या रस्त्याच्या साईड पट्टीच्या अंदाजपत्रकाची प्रत आणि या कामाच्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी देण्यात आलेल्या निविदेची प्रत या माहिती व्यतिरिक्त उर्वरित तीन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या तीन मुद्याद्वारे (मुद्दा क्र. ३,४ व ५) अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश या अधिनियमामध्ये नाही. परिणामी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०५.२०१० रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या

माहितीचे अवलोकन करता, ती सकृतदर्शनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीस जरी आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती पुरविली गेली असली तरी अपिलार्थीने दि. १५.१२.२००८ रोजी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १४.०१.२००९ रोजी अगर तत्पूर्वी देय असताना ही माहिती अंदाजे एक वर्ष चार महिने इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झाली आहे, ही बाब नजरेआड करुन चालणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादित होते की, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे कष्ट घ्यावे लागले असते किंवा ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागली असती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.डी.साळवे यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.डी.साळवे यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव,श्री. बी.डी.साळवे यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव श्री.

कृ.मा.प.५...

बी.डी.साळवे यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे र ऽ

कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुहास किसनराव देशमुख,रा.सन्मित्र कॉलनी, माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९४

निर्णय दिनांक ०१-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सितारामजी रामचंद्र शर्मा,<br>सन्मित्र कॉलनी, माजलगांव, तालुका माजलगांव,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव,<br>जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा नगर परिषद कार्यालय, माजलगांव, तालुका<br>माजलगांव, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | लिपीक, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे आणि त्याव्दारे आपल्या कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील २० (१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी आणि त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही असेही त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, नगरपरिषद, माजलगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, वृक्षारोपणाच्या कामासंदर्भात दिनांक ०१ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण दोन मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये जमा झालेला एकूण ट्री टॅक्स, नगरपरिषदेच्या हद्दीत किती झाडे लावली व त्यापैकी किती झाडे जिवंत आहेत व त्यांची वॉर्डनिहाय माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नसल्याने त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कर्मचा-याच्या ताब्यात होती त्या रमेश सवादे या रोखपाल या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ३०-०१-२००९ रोजी पाठविला. श्री. रमेश सवादे यांनी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही माहिती

दिली व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व विलंबाने माहिती प्राप्त झाल्याच्या कारणास्तव व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुरेश जोशी, सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. काशीनाथ तुकाराम सावंत स्वच्छता निरीक्षक आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना संबंधितांनी वेळेवर न पुरविल्यामुळे अंतिमतः ते अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तत्कालीन स्वच्छता निरीक्षक आणि रोखपाल यांच्याशी संबंधित होती, तथापि स्वच्छता निरीक्षक यांनी मुख्याधिकारी यांना दिनांक २१-०२-२००९ रोजी व रोखपालाने दिनांक १५-०२-२००९ रोजी मुख्याधिकारी यांना माहिती सादर केली. तथापि ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अपील केल्यानंतर त्यांना दिनांक १८-०३-२००९ रोजी देण्यात आली.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २९-१२-२००८ रोजी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०१-२००९ रोजी अगर तत्पूर्वी देय असताना ती अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००९ रोजी म्हणजे एकूण ४३ दिवसाच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. यापैकी प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधितांनी तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगांव यांना सादर केली असता त्यांनी ही माहिती अपिलार्थीस न पुरविता, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील

केल्यानंतर अपिलार्थीस दुस-या जन माहिती अधिका-याने माहिती पुरविली. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे पृथक्करण करता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगांव यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्राधिकरणाच्या भाग असलेल्या ज्या व्यक्तीकडे उपलब्ध आहे त्यांच्याकडे पाठविण्यासाठी मूळात २७ दिवसाचा विलंब लावला आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव हे प्रामुख्याने जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. स्वच्छता निरीक्षक व रोखपालांनी मुख्याधिका-यास अनुक्रमे दिनांक २१-०२-२००९ व दिनांक १५-०२-२००९ रोजी माहिती सादर केली असताना देखील त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्याचे टाळले. अपिलार्थीस ही माहिती उघड करण्याचे तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद श्री. अलीमुद्दीन यांनी का टाळले याची कारणे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागद-पत्रावरुन आढळून येत नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव श्री. अलीमुद्दीन हे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे आढळून येत आहे, तथापि तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद श्री. अलीमुद्दीन हे शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे आदेश आयोग देत नाही.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, नगरपरिषद, माजलगाव यांनी माहिती अधिकारी म्हणून स्वच्छता निरीक्षक व अपिलीय अधिकारी म्हणून कनिष्ठ लिपीक यांची नियुक्ती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या पोषक अंमलबजावणीच्या दृष्टीने इतक्या कनिष्ठ स्तरावरील अधिका-यांची अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याची नगर-परिषदेची कृती ही सर्वाथा चुकीची व गैर आहे. त्यामुळे संचालक, नगरपालिका प्रशासन संचाल-

नालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नगरपरिषदांमार्फत नेमले गेलेले जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या दर्जाची त्यांच्या स्तरावर तपासणी करुन जन अपिलीय अधिकारी म्हणून किमान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांची नेमणूक होईल असे पहावे, जेणेकरुन विचाराधीन अपिलाशी संबंधित प्रकरणांची पुनरावृत्ती होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सितारामजी रामचंद्र शर्मा, सन्मित्र कॉलनी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन

सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९५

निर्णय दिनांक ०१-०६-२०१०

१ श्री. मोहम्मद इक्रमुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्युम, : अपिलार्थी
ब्लॉक नंबर ७३, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, चंपा चौक
मस्जीद, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, नगरभूमापन अधिकारी यांनी त्यांची वेतनवाढ रोखल्याने त्यांच्या सेवानिवृत्ती उपदानातून एकूण १७,५५५ रुपये इतकी रक्कम वजाती करण्यात आली आहे. ती परत मिळण्याकरिता त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या सेवेच्या संदर्भात व सेवानिवृत्ती वेतनातून कपात केलेल्या रकमेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-१९९८ व १२-०२-१९९९ रोजी केलेल्या अर्जावर त्यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले उत्तर बरोबर असल्याचा निर्वाळा देऊन व अपिलार्थीस, आवश्यक वाटल्यास, स्वतंत्र अर्ज करण्याचे सूचित करुन त्यांनी हे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित कोणताही युक्तिवाद आयोगासमोर केला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या सेवा प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे व त्यांनी माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी

त्यांच्याकडे ही माहिती उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते "परिक्षण भूमापक" या पदावर कार्यरत असताना त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये काही नोंदी घेण्यात आल्या. या नोंदीच्या आधारे अपिलार्थीची वेतनवाढ रोखण्यात आली व परिणामी अपिलार्थीस सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या आर्थिक लाभामध्ये घट झाली. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-१९९८ व दिनांक १२-०२-१९९९ रोजी यासंदर्भात अर्ज केले. या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, ही माहिती त्यांना अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-१२-१९९८ व दिनांक १२-०२-१९९९ रोजीच्या अर्जांच्या अनुषंगाने त्यांनी संबंधित प्राधिकरणाशी दिनांक ०९-०२-२००९ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व तसेच या विषयावर त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात जेणेकरुन अपिलार्थीच्या विनंती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अपिलार्थीस ज्ञात होऊ शकेल. जर अपिलार्थीच्या संदर्भित अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसेल तर, त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये तसे कळवावे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील.

अपिलार्थी यांनी प्रमुख लिपीक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला आहे. या पत्राची प्रत आयोगास सध्याचे जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार वृत्तीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या पार्श्वभूमीवर असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जाशी संबंधित कागदपत्रे गांभीर्यपूर्वक जतन करुन ठेवण्याच्या सूचना त्यांच्या कार्यालयातील संबंधितांना द्याव्यात, जेणेकरुन अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळता येईल.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्राप्त झालेल्या सेवानिवृत्तीच्या लाभासंदर्भात काही अभिप्राय दिले आहेत. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या मुद्दयासंदर्भात संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे वेगळ्याने अर्ज करावा आणि आपल्या गा-हाण्याची तड लावून घ्यावी. त्यांच्या सेवासंदर्भातील प्रशासकीय बाबीवर निर्णय घेण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या या मुद्दयावर आयोगास निर्णय देता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहम्मद इक्रमुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्युम, ब्लॉक नंबर ७३, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, चंपा चौक मस्जीद, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९७

निर्णय दिनांक ०१-०६-२०१०

१ श्री. प्रमोद तानाजीराव साळुंके, : अपिलार्थी
रा. विकासनगर, एम. आय. डी. सी. रोड, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी उशिरा व असमाधानकारक दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी अपील केले असता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीमध्ये माहिती उपलब्ध

करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे, उस्मानाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असलेले शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता या तांत्रिक संवर्गाच्यासंदर्भात ऑक्टोबर २००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उस्मानाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत शाखा / कनिष्ठ अभियंता या तांत्रिक संवर्गाची मंजूर पदाची, भरलेल्या व रिक्त पदाची सांख्यिकी माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

यानंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक ११-१२-२००८ रोजी व्यक्तिशः उपस्थित राहिले व तदनंतर अपिलार्थीस दिनांक १९-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली, तथापि प्राप्त माहिती असमाधानकारक असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील करताना अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संपूर्ण जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असणा-या कनिष्ठ अभियंत्यांची माहिती आवश्यक असताना त्यांना फक्त बांधकाम विभागाशी संबंधित माहिती देण्यात आली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०३-२००९ रोजी निर्णय देऊन,

अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा विभाग व लघुपाटबंधारे विभाग यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती एकत्रित स्वरुपात अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पोस्टाने पाठविली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०३-२००९ रोजी पोस्टाने पाठविल्यासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीच्या उता-याची व पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडील तांत्रिक संवर्गातील माहिती हवी होती. जिल्हा परिषदेमध्ये सिंचन विभाग, बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग असे तीन तांत्रिक विभाग आहेत. हे तीनही विभाग ही स्वतंत्र प्राधिकरणे असल्यामुळे अपिलार्थीने प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी या तीनही प्राधिकरणाकडे स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक होते, परंतु त्यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद यांच्याकडे प्रथमतः माहितीसाठीचा मूळ अर्ज केला. त्यांनी माहिती

दिल्यानंतर या माहितीमध्ये इतर विभागाची माहिती समाविष्ट नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलासंदर्भात दिलेल्या निर्णयानुसार कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद यांनी सर्व संबंधितांकडून माहिती घेऊन ती अपिलार्थीस दिनांक २१-०३-२००९ रोजी प्रत्यक्षात टपालाव्दारे पाठविली आहे. ही माहिती अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ सबळ पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता या अर्जामध्ये त्यांना व्यक्तिशः माहितीची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पोस्टाने पाठविण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्याकडे उपलब्ध असून त्यांनी ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांकडून व्यक्तिशः विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून उपरोक्त कालावधीमध्ये विनामूल्य व व्यक्तिशः पुरविली जाईल असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रमोद तानाजीराव साळुंके, रा. विकासनगर, एम. आय. डी. सी. रोड, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९८

निर्णय दिनांक ०१-०६-२०१०

१ श्री. गाडेकर सुधाकर उमराव, : अपिलार्थी
घर नं. २४८, (एम. आय. जी.) एन-२, म्हाडा कॉलनी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीमध्ये, भोकरदन तालुक्यामधील प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या कामांपैकी किती कामे मंजूर झाली, त्यापैकी किती कामे मजूर सहकारी संस्थांना दिली, किती कामाच्या निविदा काढल्या व किती कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला दिली, या सर्व कामांची कामनिहाय माहिती व ही कामे देताना शासन निर्णयाचे पालन केले का ? अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आणि या पत्राची प्रत उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन यांना दिली. उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांनी त्यांच्या दिनांक १०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विभागाकडून प्राप्त करुन घेण्याचे किंवा ही माहिती प्रत्यक्ष पाहण्याचे त्यांना सूचित केले व पुढे त्यांच्या विभागातील तांत्रिक शाखेतील संबंधित शाखा अभियंता यांच्याशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या-कडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने आणि आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत साक्षांकीत स्वरुपात विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची शिफारस राज्य माहिती आयोगाकडे व सचिव (जलसंपदा) यांना केली. यानंतर परत अपिलार्थीने दिनांक ११-१२-२००८

रोजी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या कार्यालयात स्वतः हजर राहून त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याचे कार्यकारी अभियंता यांना अवगत केले. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की त्यांना, आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती प्राप्त झालेली नाही. ते स्वतः एक बेरोजगार अभियंता असून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रचलीत शासकीय नियमांचे पालन न करता प्रत्येक कामाचे तुकडे करुन त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना ही कामे दिली आहेत. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांची अपेक्षित माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानुसार त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०३-२०१० रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी ' ही कामे देताना शासन निर्णयाचे पालन केले आहे का ? ' या मुद्दयाची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमा-

तील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे देय असणार नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील या भागाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे व अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे समर्थन करणारी स्पष्टीकरणे देणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली आहे. 'व्यक्तिश:' माहिती मागितल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून हस्तगत करुन घेण्याकरिता अपिलार्थीने प्रयत्न केले असल्याचे त्यांच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या पत्रावरुन सिध्द होत आहे. यावरुन या प्रकरणी अपिलार्थीने आपले उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या कार्यालयात उपलब्ध असावयास पाहिजे, कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या लघुपाटबंधा-याच्या कामाच्या निविदा या विभागीय स्तरावर निश्चित केल्या जातात. तसेच मजूर सहकारी संस्थांना व बेरोजगार अभियंत्यांना कामे देण्यासंदर्भात शासन निर्णयाची अंमलबजावणी प्रत्यक्षात कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर होत असते. त्यामुळे मूळात अपिलार्थीच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद हा पूर्णपणे चुकीचा असल्याचे येथे सिध्द होत आहे. उप अभियंता यांनी अपिलार्थीस परत हीच माहिती कार्यकारी अभियंता व त्यांच्या कार्यालयातील तांत्रिक शाखेतील शाखा अभियंता यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांच्या दिनांक १०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे

अपिलार्थीस सूचित केले आहे. अशा प्रकारे या प्रकरणाशी संबंधित वरील पत्रव्यवहार पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी हेतुपुरस्सर टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००८ रोजी आदेश दिल्यानंतरही अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अंदाजे सव्वा वर्षाच्या कालावधीनंतर पोस्टाने पाठविण्याचे सौजन्य (?) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविले आहे. या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सांख्यिकी स्वरुपात दिलेली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामनिहाय माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या भागाकडे दुर्लक्ष करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने व अपूर्ण दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत कामनिहाय, विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना (श्री. आर. जी. यादव, सध्या याच पदावर) यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली

असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती, जी अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय आहे ती, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण स्वरुपात पुरवून संबंधित कार्यकारी अभियंता यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देण्याच्या कृतीमुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांना देखील अधिनियमातील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना (श्री. आर. जी. यादव, सध्या याच पदावर कार्यरत) व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत कामनिहाय, व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना (श्री. आर. जी. यादव, सध्या याच पदावर कार्यरत) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गाडेकर सुधाकर उमराव, घर नं. २४८, (एम. आय. जी.) एन-२, म्हाडा कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९९

निर्णय दिनांक ०१-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे,<br>रा. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड श्री. पी. बी. परळीकर यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३१-०५-२०१० रोजीचे पत्र मूळ प्रतीत आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १६-०१-२००९ रोजी प्राप्त झाली असल्याने, त्यांनी आयोगाकडे सादर केलेले विचाराधीन अपील चालविण्याची त्यांची इच्छा नसल्याचे नमूद करुन माहिती मिळाल्याने त्यांचे अपील खारीज करावे अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या विनंतीचा विचार करता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, रा. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८७

निर्णय दिनांक ०१-०६-२०१०

१ श्री. बाळासाहेब नारायण तौर, : अपिलार्थी
रा. मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका
गेवराई, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. जैन, श्री. अ. रहीम अ. हमीद, श्री. बी. बी. परदेशी, श्री. कल्याण पैठणे, श्री. प्रदीप पोटभरे, श्री. नंदकुमार मंत्री, श्री. अ. रफीक अ. हमीद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाव्दारे त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आणि मुदतीत माहिती न दिल्याबद्दल माहिती अधिका-यावर कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, गेवराई शहरातील त्रयस्थ पक्ष तथा स्वस्त धान्य दुकाने, दुकान क्रमांक २, ३, ६, १४ व १८ यांच्याकडून ०१ मे २००८ ते ३० जून २००८ या कालावधीतील स्वस्त धान्य व रॉकेल वाटपाच्या कॅशमेमोच्या झेरॉक्स प्रती, त्रयस्थ पक्ष तथा घाऊक विक्रेते श्री. जैन व श्री. अ. रहिम अ. हमीद यांच्या विक्री रजिस्टर व स्टॉक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, त्रयस्थ पक्ष श्री. बी. बी. परदेशी, श्री. कल्याण पैठणे, श्री. प्रदीप पोटभरे, श्री. नंदकुमार मंत्री, श्री. सय्यद इस्माईल यांच्या विक्री रजिस्टरच्या प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्रयस्थ पक्षास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सादर करण्याचे कळविले. परंतु त्रयस्थ पक्षांनी त्यांच्या विनंतीस कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीच्या माहितीसाठी-च्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली असल्याच्या कारणास्तव अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून, या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्रयस्थ पक्षाकडे माहिती नसल्याचे कारण दर्शवून तहसील कार्यालय त्यांना माहिती देण्याचे टाळत आहे. ही माहिती राशन व रॉकेल म्हणजे आर्थिक व्यवहारासंबंधी असल्याने आणि त्यामध्ये नायब तहसीलदार, तहसीलदार व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण मिळून राशन, रॉकेलचा काळाबाजार करीत असल्यामुळे ते माहिती देत नाहीत, तरी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना २५० रुपये प्रमाणे शास्ती लावावी व मुख्य सचिव यांच्या-मार्फत सेवा शिस्तभंगाची कारवाई करावी आणि त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्णतः त्रयस्थ पक्षाच्या ताब्यात असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना त्रयस्थ पक्षावर अवलंबून राहावे लागत होते. तथापि त्यांनी आता त्रयस्थ पक्षाकडून अपिलार्थीने मागणी केलेली एकूण ७२७ पृष्ठांची माहिती प्राप्त करुन घेतली आहे व ती त्यांच्या-सोबत आणलेली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी त्रयस्थ पक्ष श्री. प्रदीप पोटभरे व श्री. सय्यद इस्माईल यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त व्हावयाची आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले त्रयस्थ पक्ष श्री. अब्दुल हमीद यांचे नाव त्यांच्याकडे रॉकेल विक्रेत्याच्या यादीमध्ये समाविष्ट नाही. तसेच त्यांना सदरचा इसम गावात आढळून आलेला नाही. त्यामुळे या कथित त्रयस्थ पक्षाकडील माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. त्यांनी आयोगास

पुढे असे स्पष्ट केले की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली आहे तिचे स्वरुप जरी सार्वजनिक असले तरी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्रयस्थ पक्षावर अवलंबून राहावे लागत होते. आता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षापैकी श्री. प्रदीप पोटभरे व श्री. सय्यद इस्माईल वगळता उर्वरित त्रयस्थ पक्षांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने बरोबर आणली आहे. ती माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी आणि याच कालावधीमध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उर्वरित त्रयस्थ पक्ष श्री. प्रदीप पोटभरे आणि श्री. सय्यद इस्माईल यांच्याकडून प्राप्त करुन ती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी त्रयस्थ पक्षाशी दिनांक ०४-०८-२००८ रोजी संपर्क साधून अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब नारायण तौर, रा. मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गेवराई,

तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३८

निर्णय दिनांक : ०२.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शामराव सुंदरराव खरात,<br>रा.पाथरवाला बु., ता.अंबड,जि.जालना. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर सुनावणी न ठेवल्यामुळे व कोणतेही आदेश पारित न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जालना जिल्हयातील भोकरदन तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील लाखो रुपयांची यंत्रणा धुळ खात पडून असल्याबद्दल व शहागड आरोग्य केंद्रामध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञाच्या

अभावी रुग्णांची गैरसोय व अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात राहत नसल्याबाबत, काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी दि. ०१.०१.२००६ ते ०६.१२.२००८ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयास शासनाने गोरगरिब रुग्णांवर औषधोपचारासाठी पाठविण्यात आलेली ३० ते ३५ लाखाची यंत्रसामग्री अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे पडून राहण्याकरिता जबाबदार डॉक्टर व कर्मचाऱ्यावर केलेल्या कारवाईची माहिती, भोकरदन येथील वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी औरंगाबाद व जालना येथून जाणे-येणे करतात त्यांच्यावर शासनाच्या दि. २४.०६.२००८ व ०५.०७.२००८ च्या परिपत्रकानुसार केलेली कार्यवाही, शहागड आरोग्य केंद्र व इतर सहा उपकेंद्रात येणाऱ्या तीस गावातील ग्रामस्थांचे रुग्ण तपासणीसाठी मायक्रोस्कोपी सेंटर व प्रयोगशाळा तंत्रज्ञ पद नसल्यामुळे रुग्णांना तपासणीसाठी खाजगी रुग्णालय व तालुका रुग्णालयात जावे लागते त्यास जबाबदार असणाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि. २४.०६.२००८ व ०५.०७.२००८ च्या परिपत्रकान्वये जन माहिती अधिकारी यांच्या अखत्यारितील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर केलेली कारवाई आणि घनसावंगी तालुक्यात आरोग्य अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे दोन बालकांचा मृत्यू झाला, यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर केलेली कारवाई - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत व शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीमध्ये निर्णय न

दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून दि. ०१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती खोटी व चुकीची आहे. कारण त्यांनी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या आधारे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. वर्तमानपत्रामध्ये सदर यंत्रसामग्री धुळ खात असल्याबाबतचे फोटोही प्रसिध्द झाले आहेत. परंतु त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयास यंत्रसामग्री धुळ खात पडून नाही, असे खोटे उत्तर दिले आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ६ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले व त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना सत्य स्वरुपात अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना यांनी घेऊन दि. १३.०४.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीचे अपील मान्य केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण ५ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे उपलब्ध होती, ती त्यांनी दि. ०१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहिती त्यांनी दि. २५.०५.२०१० रोजी अपिलार्थीस पोस्टाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थीने ज्यावेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार

माहिती मागितली त्यावेळी श्री. गायकवाड नावाचे जिल्हा आरोग्य अधिकारी हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. सध्या ते जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद या पदावर कार्यरत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,३ व ५ शी संबंधित माहिती वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांवर आधारित आहे. जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांचे कार्यालय यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दि. ०१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे. तथापि ही माहिती खोटी असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीस ही माहिती खोटी वाटण्याचे कारण म्हणजे वर्तमानपत्रामध्ये संबंधित बातम्यांच्या अनुषंगाने प्रसिध्द झालेल्या छायाचित्रांची प्रत हे होय. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना अपेक्षित असलेली कार्यवाही ही पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेल्या कार्यवाही संदर्भात त्यांनी आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०५.२०१० रोजी पाठविली असून या माहितीची एक अतिरिक्त प्रत त्यांनी आयोगासमोर अपिलार्थीस हस्तांतरित केली आहे.अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना आता प्राप्त झाली आहे. यापैकी मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने पुरविली असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व

स्वरुप पाहता, या मुद्यांवर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विलंब लागावा असे कोणतेही कारण संभवत नाही. अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदींचा भंग केल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब उपसंचालक (आरोग्य सेवा), औरंगाबाद यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गायकवाड (सध्या जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद जिल्हा परिषद, उस्मानाबाद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) उपसंचालक (आरोग्य सेवा), औरंगाबाद यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गायकवाड (सध्या जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद जिल्हा परिषद, उस्मानाबाद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०२.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला बु., ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपसंचालक (आरोग्य सेवा), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३९
निर्णय दिनांक : ०२.०६.२०१०

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
रोपवन अधिकारी,
सामाजिक वनीकरण, वनक्षेत्र भोकरदन,
जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ते पैसे भरण्यासाठी तयार असताना देखील कोणत्याही पध्दतीने जन माहिती अधिकारी यांनी पैसे न स्वीकारल्याने आणि त्यामुळे त्यांनी अपील केले असता, त्यांना कल्पना न देता त्यांचा अपील अर्ज निकाली काढला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर दंडात्मक व शास्तीची कारवाई करुन अपिलार्थीस माहिती द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची, विनंती आयोगास केली आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत रोजगार हमी योजनेअंतर्गत शेलूत गावात केलेल्या कामाचे व जिवधरण फाटा ते पारध या रस्त्यावर खड्डे खोदून लावलेल्या झाडाचे व सिल्लोड ते भोकरदन या रस्त्यावर रोहयोअंतर्गत केलेल्या कामाच्या मस्टरच्या व मोजमापपुस्तिकेच्या प्रती, मजूरांच्या गावांची नावे, अंदाजपत्रकाच्या मूळ रकमेची यादी व कोणत्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर पेमेंट वाटप करण्यात आले आणि तलाठी रिपोर्ट, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४६०/- इतके त्यांना स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा भोकरदन येथे चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले व सदर चलनाची प्रत माहिती अधिकाऱ्यास सादर केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासित केले. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी शुल्क न भरता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०३.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०४.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविल्याचा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ग्राहय धरुन, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने दि. ०४.०४.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनामूल्य माहिती देण्याची विनंती केली. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत माहिती मागविली आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली आहे. अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले आहे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.०२.२००९ रोजीच्या पत्रामध्ये माहितीच्या शुल्काचा तपशील - उदाहरणार्थ, अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर - दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस एकूण शुल्क आवश्यक त्या तपशिलाशिवाय कळविण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(३)(क) चा भंग केला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि. ०६.०२.२००९ रोजीचे पत्र अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अपिलार्थीस कोणतेही शुल्क आकारता येणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकाऱ्यावर शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे, या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर, असद्हेतूने नाकारल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून न आल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०२.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,रा.दाना बाजार,जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा रोपवन अधिकारी,सामाजिक वनीकरण, वनक्षेत्र भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४०

निर्णय दिनांक : ०२.०६.२०१०

१. श्री.शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक,
लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ०५.०१.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाल्यामुळे माहिती देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागेल, असे पत्र प्राप्त झाले परंतु या कालावधीनंतरही त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २५.०३.२००९ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनीही त्यांच्या अपील अर्जाची दखल घेतली नाही व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची

मागणी कायम ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०९.२००७ ते ०५.०१.२००९ या कालावधीमध्ये शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या संदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन माहिती देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागेल, अशी अपिलार्थीस कल्पना दिली व अपिलार्थीकडे त्यांना माहिती देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी वाढवून देण्याची विनंती केली. तथापि यानंतरच्या कालावधीमध्येही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २५.०३.२००९ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखील या अपील अर्जावर कोणतेही आदेश न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. जन अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, लातूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना झाली असल्यामुळे त्यांच्या कार्यालयाचे सर्व अभिलेखे अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरित

करण्यात आले होते. आता त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय कार्यालयाकडून हस्तगत करुन घेतले असून ते अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंधरा दिवसांच्या आत त्यांना देतील.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस देणे अनिवार्य होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांच्याकडे, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करते वेळी उपलब्ध नव्हती, तर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतदीनुसार सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच पाच दिवसांच्या आत त्या अर्जाची प्रत अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय,लातूर यांच्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि या प्रकरणी त्यांनी अशाप्रकारची कोणतही कृती केली नाही. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य देण्याचे आयोगास आश्वासित केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.जी.माळी, सहायक अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक लातूर यांचे कार्यालय यांनी त्यांच्याकडील दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे एका महिन्यात माहिती देण्याचे आश्वासित करुनही व तसेच अधिनियमाद्वारे विहित केलेली

मुदत व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची सकारात्मक कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब उपसंचालक (आरोग्य सेवा), लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस.जी.माळी, तत्कालीन सहायक अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक,लातूर यांचे कार्यालय (सध्या ग्रामीण रुग्णालय,तेर,जि.उस्मानाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) उपसंचालक (आरोग्य सेवा), लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस.जी.माळी, तत्कालीन सहायक अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक,लातूर यांचे कार्यालय (सध्या ग्रामीण रुग्णालय,तेर,जि.उस्मानाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शेख लालासाहेब राजेसाहेब,रा.रियाज कॉलनी, शामनगर,लातूर-४१३५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपसंचालक (आरोग्य सेवा),लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४१

निर्णय दिनांक : ०२.०६.२०१०

१. श्री.मो. मोईज खान पठाण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
फैजुल उलूम हायस्कुल,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी
शिक्षण विभाग (उच्च मा.),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अंशतः व अस्पष्ट माहिती पुरविली आहे व खोटे संदर्भ देऊन त्यांची दिशाभूल केली असल्यामुळे आणि त्रयस्थ पक्षाचे कारण दर्शवून खोटे जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवा करणाऱ्यांची पाठराखण केली असल्यामुळे, त्यांच्यावर दबाव टाकण्याचा व त्यांना आमिष देण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या संस्थेमध्ये मुखेड तालुक्यातून अतिरिक्त शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या त्रयस्थ पक्ष श्रीमती मेहजबीन बेगम पि.महंमद खय्युम यांच्या सेवापुस्तिकेची व जात प्रमाणपत्राची प्रत आणि संस्थेतील कार्यरत कर्मचारी व शिक्षकांच्या जात प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांना निश्चितपणे कधी व कशाप्रकारे प्रतिसाद दिला हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगास कळून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०३.२००९ रोजी जन माहिती अधिकाऱ्याने अंशतः माहिती देऊन दिशाभूल केल्याच्या कारणास्तव प्रथम अपील केल्याचे आयोगास आढळून येत आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीने तदनंतर वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीचे स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०२.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मो. मोईज खान पठाण, द्वारा. राम संगनवार,ओम निवास, प्र.नि.हा. शाळेजवळ, कैलासनगर, नांदेड-४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,फैजुल उलूम हायस्कुल,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४२

निर्णय दिनांक : ०२.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर नगर परिषदेच्या सार्वजनिक सभागृहाच्या संदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगर परिषदेच्या सार्वजनिक सभागृह भाडयाने दिलेल्या ठरावाची कॉपी क्र. १ व २, मिनिट्सच्या छायाप्रती, ठरावाचा दिनांक व शिफारसपत्राची प्रत, ठराव अमान्य असेल तर डिपॉझीट केलेली रक्कम परत घेता येणे अथवा न येणे याबाबतच्या नियमावलीची छायांकित प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीने या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे या अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे अनिवार्य आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०४.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत मिळाली नसावी, असे अनुमान आयोग काढत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०२.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश बाबुराव क्षिरसागर,द्वारा मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर-४१३५१२

२. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०८
निर्णय दिनांक ०२/०६/२०१०

१ श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी,
तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड

निर्णय

श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०६.२००९ रोजीचे दि. २३.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २४.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २७.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते, दिवाणी न्यायालय, परळी वैजनाथ, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०९
निर्णय दिनांक ०२/०६/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | | |

<u>निर्णय</u>

श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २३.०७.२००९ रोजीचे दि. ३१.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०८.१०.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २१.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०६.०२.२००८ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या

दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४५० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२/०६/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, १, समतानगर, कांचनवाडी, वाल्मी नाका, पैठणरोड, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४३

निर्णय दिनांक ०२-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापूरी, पो. वडेपुरी S.R.T., तालुका लोहा,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक प्रकल्प अधिकारी (स. नि.) जिल्हा ग्रामीण<br>विकास यंत्रणा, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योनजेच्यासंदर्भात दिनांक ३१-०३-२००६ ते १२-१२-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्यासाठी त्यांना वेळ लागणार असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, रा. जानापूरी, पो. वडेपुरी S.R.T. तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४४

निर्णय दिनांक ०२-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलास विष्णुदास मोरे,<br>रा. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी

कायम ठेवलेली आहे व संबंधितांवर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-०१-२००६ ते ३१-०९-२००८ या कालावधीशी संबंधित ग्रामसभेच्या अहवालासंदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पाथरी तालुक्यामध्ये या कालावधीमध्ये किती ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचे अहवाल इतिवृत्तांतासह जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल केले आहे त्या ग्रामपंचायतीची नावे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या ग्रामसभेच्या इतिवृत्तांताचा दिनांक व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवक रजिस्टरमधील नोंद क्रमांक, ज्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा अहवाल येणे बाकी आहे त्या ग्रामपंचायतीची नावे, या कालावधीमध्ये कोणत्या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण झाले आहे त्यांची नावे व लेखा परीक्षणाचा दिनांक व लेखापरीक्षण न झालेल्या ग्रामपंचायतीची नावे, पाथरी तालुक्यात कार्यरत असलेल्या ग्रामसेवक व सरपंचाची नावे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकीत स्वरुपात व टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ३०-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न

झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व संबंधितांनी त्यांना वेळेत माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी, श्रीमती एस. व्ही. पांडव यांनी कोणताही सकारात्मक अथवा नकारात्मक प्रतिसाद दिला नाही. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००९ रोजी आदेशित करुनही, त्यांनी अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत कोणतीही माहिती पुरविली नाही. आज देखील अपिलार्थीस दिनांक २९-११-२००८ रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती कोणत्याही स्वरुपात उपलब्ध झालेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती मर्यादित स्वरुपाची असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तर अधिनियमातील कलम ४ मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची अशी माहिती आहे. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-०३-२००९ रोजीच्या निर्णयास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, या बाबीची नोंद आयोगाने गांभीर्यपूर्वक घेतली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाव्दारे पुरविली.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी श्रीमती एस. व्ही. पांडव यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. त्यांच्या अपिलार्थीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (ग्रामविकास) मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी श्रीमती एस. व्ही. पांडव, यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाव्दारे पुरवावी.

३.	सचिव (ग्रामविकास) मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती एस. व्ही. पांडव, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**　　　　　　　　　　　　**( वि. बा. बोरगे )**

**दिनांक　　०२-०६-२०१०**　　　　　　**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. विलास विष्णुदास मोरे, रा. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२	जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४५

निर्णय दिनांक ०२-०६-२०१०

१ श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग क्रमांक २, जालना

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०२-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने त्यांची याबाबत कोणतीही तक्रार नसल्यामुळे व त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १०४५/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७२

निर्णय दिनांक ०२-०६-२०१०

१ श्री. एस. एम. पिसोळकर, : अपिलार्थी

सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, शिवाजीनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सर्वे नंबर १८ मौजे जंगमवाडी, नांदेड येथील जमिनीच्या मोजणी-संदर्भात दिनांक ३१-०१-१९६४ ते १९-०१-१९८८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जिल्हा भूमि निरीक्षक यांनी सर्वे नंबर १८/१ व १८/२ चे दिनांक ३१-०१-१९६४ रोजी मोजणी केलेले नकाशे, सिटी सर्वे नंबर ६०/१४७८ मध्ये वरिष्ठ न्यायालयाने हुकूम केल्यावरुन सर्वेअरने दिनांक १६-०६-१९७९ ला

सर्वे नं. १८/१ व १८/२ ची मोजणी केली त्याचे नकाशे, दिनांक ०७-०७-१९८७ ला श्री. एन. एन. पवार आणि श्री. आर. पी. राठोड यांनी १८/२ ची २८८५.२ चौरस मीटर जागा मोजून दाखविली तो नकाशा व श्री. अब्दुल हनन सर्वेअरने दिनांक १९-०९-१९८८ ला सर्वे नंबर १८ ची मोजणी केलेल्या नकाशाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित असलेली माहिती आठ दिवसाच्या आत त्यांच्याकडून घेऊन जाण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी ही माहिती दिनांक ०२-०३-२००८ रोजी व्यक्तिशः पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे दिनांक १७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व यासंदर्भात कोणतेही आदेश पारीत केले नाहीत, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. या जमिनीच्या प्रकरणात मा. दिवाणी न्यायालयात सध्या दावे दाखल

झाले असून त्यांना अद्यापपावेतो प्राप्त व्हावयाच्या मोजणी नकाशाच्या प्रती या दाव्याच्या नस्तीमध्ये उपलब्ध आहेत. सदरचे नकाशे न्यायालयात सादर करताना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या प्रतिनिधीने या नकाशाच्या मूळ प्रती त्यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असल्याचा जबाब दिला आहे. सदरचे नकाशे ज्या दाव्यासंदर्भात अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहेत त्या दाव्याचा क्रमांक व दिनांक त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००८ रोजी केलेल्या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांना पुरविला आहे. तथापि त्यांनी सूचित केल्याप्रमाणे माहितीचा शोध न घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३ व ४ ची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली होती. यातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांनी दिनांक ०२-०३-२००८ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे व मुद्दा क्रमांक १, ३ व ४ शी संबंधित माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने ही माहिती त्यांच्या कार्यालयाने नष्ट केली आहे. सदर माहिती नष्ट केल्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे पुरावा आहे काय अशी आयोगाने विचारणा केली असता, अशा प्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००८ रोजी नोंदविलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दाव्याच्या नस्तीचा त्यांनी शोध घेतलेला नाही. तसेच ही माहिती माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे नष्ट केल्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे आता माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. जर ही नस्ती माहिती अधिकारी यांनी शोध घेऊनही त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही तर ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या

कार्यालयातील ज्या कर्मचा-याकडे होती त्यांच्यावर माहिती अधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्यांना पुढे असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एस. एम. पिसोळकर, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, शिवाजीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७३

निर्णय दिनांक ०२-०६-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिंगाडे अंन्सीराम बापुराव,<br>व्दारा- राम लांडे, होळकर नगर, अंबड, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, जालना | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी श्री. बी. जे. पांचाळ, उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३१-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली असून, पाहणीनंतर त्यांचे पूर्ण समाधान झाले आहे व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आता आवश्यकता नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाहण्यासाठी उपलब्ध झाल्याने ते निकाली काढण्याची केलेली विनंती, आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिंगाडे अंन्सीराम बापुराव, व्दारा- राम लांडे, होळकर नगर, अंबड, तालुका

अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७४

निर्णय दिनांक ०२-०६-२०१०

१ श्री. संतोष सुभाष जाधव, : अपिलार्थी

उंबरे गल्ली, नेहरु चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,

उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २५-०५-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्या घरी दिनांक २४-०९-२००८ रोजी प्राप्त झाली होती, तथापि ही बाब त्यांच्या घरच्यांनी अपिलार्थीच्या निदर्शनास न आणून दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले होते. सदर माहिती त्यांना आता प्राप्त झाली असल्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील दिनांक २५-०५-२०१० रोजी मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष सुभाष जाधव, उंबरे गल्ली, नेहरु चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६२

निर्णय दिनांक : ०३.०६.२०१०

१. श्री. भिमराव हरिभाऊ मोरे, : अपिलार्थी
रा. रांजणगाव (शे.पू.),
ता. गंगापूर, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, रांजणगाव (शे.पू.),
ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
जि. औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, गंगापूर,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निकाल देताना पक्षपातीपणा केला गेला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९९८-२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे आणि त्यातील उपमुद्यांद्वारे विचारली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात अद्ययावत करुन ठेवली असल्याचे व त्याची फीस भरुन ती हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने,अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्याकडे दि. २९.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, परंतु यासंदर्भात त्यांनी दि.१२.०६.२००९ रोजी अपिलार्थी व संबंधित ग्रामसेवक यांच्याबरोबर एक बैठक घेऊन, या बैठकीचे इतिवृत्त दि. १२.०६.२००९ रोजी जारी केले. या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की,त्यांनी या प्रकरणी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेल्या माहितीसाठी निश्चित किती शुल्क भरावयाचे हे कळविले नसल्याने ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरु शकले नाहीत व त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्यांना माहिती पाहून जाण्याच्या सूचना संबंधितांनी दिल्या. तथापि त्यांना ही माहिती लिखित स्वरुपात अपेक्षित असल्याने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई आदेशित करावी, अशी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे दहा वर्षांची माहिती मागितली असून माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पाहून जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी कधीही नाकारलेले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जरी १९९८-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असली तरीही या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठया प्रमाणात कळवावी लागली असती अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, "गावात कोणत्या ठिकाणी काम करण्यात आले, ते गावाच्या नकाशामध्ये दर्शविण्यात यावे" या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एखादी माहिती तयार करुन मागणे व जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदाराच्या विनंतीनुसार ती माहिती तयार करुन अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये समाविष्ट नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील गावनकाशावर त्यांनी गेल्या दहा वर्षात केलेली कामे दाखविली आहेत काय व अशाप्रकारचा नकाशा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, याची विचारणा आयोगाने केली असता, संबंधित

ग्रामसेवकाने अशाप्रकारची माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये तयार करण्याची व ती जतन करण्याची पध्दत प्रचलित नसल्याचे आयोगास अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ग्रामपंचायतीने केलेले काम गावाच्या नकाशावर दाखवून नंतर त्या नकाशाची प्रत अपिलार्थीस पुरविण्याची कार्यवाही करणे, अधिनियमातील तरतुदींशी, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे, विसंगत असल्यामुळे, मान्य करता येणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती ही, अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्यामुळे व ती माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्यामुळे आता जन माहिती अधिकाऱ्यास ती अपिलार्थीस पुरवावी लागेल.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन माहिती देऊ केली असली तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०५.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा चुकीचा आहे. कारण तो अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क, आवश्यक त्या तपशीलासह कळविणे त्यांना अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे गरजेचे आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क किती आहे, याचा उल्लेख त्यांच्या दि. ०५.०.२००९ रोजीच्या पत्रामध्ये नसल्यामुळे आणि तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती मागितली असताना देखील त्यांना ही माहिती ग्रामपंचायत कार्यालयाकडून हस्तगत करुन घेण्याचे जन माहिती अधिकारी यांनी केलेली सूचना ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार ज्या माध्यमाद्वारे अर्जदारास माहिती आवश्यक आहे त्याच माध्यमाद्वारे त्यांनी अर्जदारास माहिती देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असल्याने त्यांच्या अर्जास माहिती अधिकाऱ्याने देखील नोंदणीकृत

टपालाद्वारे प्रतिसाद देणे गरजेचे होते. या प्रकरणी अपिलार्थीस असा प्रतिसाद देण्याच्या ऐवजी माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करुन घेण्याचे सूचित करणारी माहिती अधिकाऱ्याची कृती चुकीची आहे.परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली संपूर्ण देय माहिती विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयात स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रतिसाद दिला असल्याने व या प्रतिसादावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय होत असलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भिमराव हरिभाऊ मोरे,रा. रांजणगाव (शे.पू.),ता. गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, रांजणगाव (शे.पू.),ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६३

निर्णय दिनांक : ०३.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पांढरे बाबुराव ईरप्पा,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय,<br>उदगीर, जि.लातूर | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, उदगीर, जि.लातूर | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उदगीर शहरातील महात्मा गांधी गार्डनच्या पश्चिम बाजूस असलेल्या सुरक्षा भिंतीशेजारी असलेल्या नांदेड-बिदर रोड ते महात्मा गांधी रोड अशा दक्षिण-उत्तर दिशेच्या नालीवर नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये केलेल्या बांधकामासंदर्भात दि. ०१.०१.२००१ ते ०४.०३.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - अर्जात नमूद नाल्यावर झालेले अतिक्रमण काढणार काय? अतिक्रमण केलेल्या व्यापाऱ्यावर/व्यक्तिंवर पालिका काय कारवाई करणार? केली असल्यास त्याची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, महात्मा गांधी गार्डनच्या पश्चिम बाजूच्या भिंतीजवळील नांदेड-बिदर रोड ते म.गांधी रोड दक्षिण-उत्तर दिशेस नाली अस्तित्त्वात नसल्याचे व म.गांधी गार्डनच्या पश्चिम बाजूस श्री. राजकुमार शहा यांनी नगर परिषदेची परवानगी घेऊन बांधकाम केले आहे अशी माहिती पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांच्याकडे दि. ०८.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले. सदर निर्णय त्यांनी दि. ०१.०७.२००९ रोजी अपिलार्थीस कळविला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे. त्यांना प्राप्त झालेली माहिती ही विलंबाने प्राप्त झाली आहे. या माहितीने ते समाधानी नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तत्कालीन माहिती अधिकारी श्री. बसवराज भिमराव कपाळे (सध्या पाणीपुरवठा

विभागात कार्यरत) यांच्याकडे उपलब्ध होती व त्यांनी, अपिलार्थीस देण्याकरिता आवश्यक ती कागदपत्रे त्यांच्याकडे वेळेत न पुरविल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या बांधकामाबाबत, सदर बांधकामास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर नगर परिषदेमार्फत उदगीर येथील कोर्टात प्रकरण दाखल केले असून सदरची प्रकरणे सध्या न्यायप्रविष्ट आहेत. सदरच्या प्रकरणांचा क्र. २४८/०२ व ३०२७/२००२ , दि. २०.०६.२००२ असा आहे. या प्रकरणाची सद्यस्थिती त्यांनी अपिलार्थीस दि. ०८.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांनी संदर्भित केलेल्या कथित अनधिकृत बांधकामावर नगर परिषदेने कार्यवाही केली असल्यास त्याची माहिती हा भाग वगळता, उर्वरित कोणत्याही भागावर मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय नाही. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या उर्वरित भागाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास पुरविण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक मत, अभिप्राय व भविष्यकाळातील प्रस्ताव अशा स्वरुपाची माहिती मागणे आणि माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलची स्पष्टीकरणे आणि भविष्यकाळातील माहिती देणे अशाप्रकारची प्रक्रिया या मूळात अभिप्रेत नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, नगर परिषदेने केलेल्या कथित अनधिकृत बांधकामावरील कार्यवाही, हा भाग वगळता उर्वरित माहिती

जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०८.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होणे बाकी नाही.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. या मुद्यावर, संपूर्ण घटनाक्रमाची आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन तपासणी केली असता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा पूर्णतया दिशाभूल करणारा आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली नाली मूळात अस्तित्त्वात नाही, अशी माहिती अपिलार्थीस दिली आहे. या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.०५.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये, "माहिती अधिकाऱ्याने खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे", असे अभिप्राय दिले आहेत. यावरुन आयोगाची, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली, ही धारणा पक्की होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांचे तत्कालीन सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'माहिती अधिकारी' असे समजावे, अशी तरतुद आहे, ते श्री. बसवराज भिमराव कपाळे, पाणी पुरवठा विभाग व त्यांचे सहायक श्री. सय्यद खलील अहमद, कनिष्ठ लिपीक, हे दोघेजण जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांनी अशाप्रकारे अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी आणि विलंबाने माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल श्री. बसवराज भिमराव कपाळे व श्री. सय्यद खलील अहमद, कनिष्ठ लिपीक यांच्यावर अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार, मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांना प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) मुख्याधिकारी, नगर परिषद,उदगीर,जि.लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक (श्री. बसवराज भिमराव कपाळे,पाणी पुरवठा विभाग व श्री. सय्यद खलील अहमद,कनिष्ठ लिपीक) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांढरे बाबुराव ईरप्पा,रा.पारकट्टी गल्ली, उदगीर, ता.उदगीर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,नगर परिषद कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६४

निर्णय दिनांक : ०३.०६.२०१०

१. श्री. तावरे हरीभाऊ माधवराव, : अपिलार्थी
रा.चिकनगाव, ता.अंबड,जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय,
भोकरदन, जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जि.जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
हसनाबाद, ता.भोकरदन,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. ३०.०३.२०१० रोजीच्या निवेदनाची प्रत आयोगास सादर केली. सदर निवेदनामध्ये अपिलार्थीने, त्यांना या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे त्यांची या संदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नाही व त्यामुळे ते विचाराधीन अपील क्र. ११६४/०९ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत, असे नमूद केले असून या अर्जाच्या अखेरीस अपिलार्थीने विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे.

अपिलार्थीची सदर विनंती लक्षात घेऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. ११६४/०९, दि. १७.०७.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तावरे हरीभाऊ माधवराव,मु. पो. चिकनगाव,ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,हसनाबाद, ता.भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६५

निर्णय दिनांक : ०३.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रितेश देवलाल गोसावी,<br>रा.शिवना, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड यांच्याकडे,"मौजे शिवना,ता.सिल्लोड येथील गट क्र. १७३ फेर क्र. ७४२ मधील १९८५ मध्ये दि. २४.०४.१९८५ रोजी झालेला फेर ज्या खरेदीखताच्या आधारे झालेला आहे, त्याची नक्कल" अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास प्रतिसाद म्हणून तहसीलदार यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकाऱ्यास दिलेल्या फेर क्र. ७४२ ची प्रत अपिलार्थीस परत पुरविली.तथापि अपिलार्थीस सदरचा फेर ज्या कागदपत्रांच्या आधारे घेतला, त्या कागदपत्रांची नक्कल आवश्यक असल्यामुळे त्यांचे या माहितीवर समाधान

झाले नाही व त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांच्याकडे दि. ०५.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे तहसीलदार, सिल्लोड यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती तहसीलदार यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सुनावणीची पूर्वकल्पना आयोगाच्या कार्यालयातून दि. ३०.०४.२०१० रोजीच्या नोटीसद्वारे तसेच दि. ०१.०६.२०१० रोजी दूरध्वनीद्वारे देऊनही ते स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ०४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिवना,ता.सिल्लोड येथील ग.नं.१७३ च्या मालकीहक्कामध्ये फेर क्र. ७४२ च्या आधारे बदल करण्यात आला. सदरचा बदल ज्या कागदपत्रांच्या आधारे झाला, त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितल्या होत्या. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याऐवजी तहसीलदार सिल्लोड यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाबरोबर जोडलेली गट क्र.

१७३ मधील फेर क्र. ७४२ ची प्रत त्यांना परत पुरविली आहे. जी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितली नव्हती. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याचे येथे सिध्द होत आहे. कोणत्याही जमिनीच्या मालकीहक्कात बदल करताना आवश्यक ती कागदपत्रे बघूनच संबंधित तलाठी व तहसीलदार यांना मालकीहक्कामध्ये बदल करणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे बाकी आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी तहसीलदार,सिल्लोड यांना दि. २९.०६.२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही आजतागायत, म्हणजे अंदाजे एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती तहसीलदार सिल्लोड यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही, ही खरोखरीच दुर्दैवाची बाब आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. उपरोक्त प्रकरणी प्रथमतः चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन संबंधित तहसीलदार यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'जन माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३) सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रितेश देवलाल गोसावी,रा.शिवना, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११६६/०९ व ११६७**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६६ व ११६७

निर्णय दिनांक : ०३.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. तुकाराम आप्पाराव पास्टे,<br>रा.मोठीवाडी, ता.माजलगाव, जि.बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>मोठीवाडी, ता.माजलगाव, जि.बीड | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, माजलगाव, जि.बीड | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०७.२००९ व ०८.०७.२००९ रोजी नोंदविलेली दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**<u>अपील क्र. ११६६/०९:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, गट विकास अधिकारी यांनी काहीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत मोठेवाडी, गावठाण हद्दीमधील जिल्हा परिषद शाळेजवळील आड या मिळकतीचा नंबर, चतु:सिमा व क्षेत्रफळ अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती पुरविली व सदर माहिती दि. २३.०३.२००९ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन दिसून येत आहे. तदनंतर अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०४.२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०३.२००९ रोजी माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे त्यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास ते राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील, असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने, "गट विकास अधिकारी यांनी काहीही कार्यवाही केली नाही", या कारणास्तव वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. १२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संकलीत करुन घेण्यासाठी त्यांच्या हातून विलंब झाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. या विलंबाचे समर्थन त्यांना आयोगाने आज रोजी सुनावणीच्या वेळी पुरेपूर संधी देऊनही आयोगासमोर करता आले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०५.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना भाग होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे माहिती मागितली होती. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून देऊन ही माहिती हस्तगत करुन घेण्याचा प्रश्नही या प्रकरणी मूळात उद्‌भवत नव्हता. एवढे असूनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली माहिती ही सकृतदर्शनी, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लावलेला विलंब आयोगास नजरेआड करता येणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित ग्राम विकास अधिकारी, मोठेवाडी,तालुका माजलगाव यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, मोठेवाडी, ता.माजलगाव, श्री.

ए. एम. सावध यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

२) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, मोठेवाडी, ता.माजलगाव, श्री. ए. एम. सावध यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्र. ११६७/०९:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर काहीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत मोठेवाडी हद्दीतील घर क्र. ४४२ व नवीन घर क्र. ३८९ संदर्भात सन १९९९ ते २००० या कालावधीशी संबंधित, "सदर घर नं.चा मूळ मालक नवीन मालक हस्तातंरणाचा प्रकार, फेर कशा स्वरुपात मंजूर करण्यात आला,याबाबतची माहिती", अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत, मोठेवाडी हद्दीतील घर क्र. ४४२ जुना ३८९ नवीन घर नं.चे मालक बाबु जनार्धन गिराम हे आहेत व घर नं. चा फेरफार सन १९९९-२००० या कालावधीत झालेला नाही, असे अपिलार्थीस कळविले. तथापि यानंतर अपिलार्थीचे या माहितीने

त्यांचे समाधान न झाल्याच्या कारणास्तव त्यांनी अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु सदरचे अपील जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाले नसल्यामुळे ते या अपील अर्जावर कोणताही निर्णय देऊ शकले नाहीत.यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की,अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांनी दि. २३.०३.२००९ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना, गट विकास अधिकारी,पंचायत समिती, माजलगाव यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही, असे द्वितीय अर्जाचे कारण दर्शविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्यामुळे ते अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय देऊ शकले नाहीत, असे आयोगास स्पष्ट केले आहे.जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज करताना अपिलार्थीने त्यांचे समाधान झाले नाही, अशाप्रकारच्या मोघम कारणास्तव प्रथम अपील केल्याचे आढळून आले आहे व तदनंतर आयोगाकडे गट विकास अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून द्वितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने गट विकास अधिकाऱ्याकडे दि. ०१.०४.२००९ रोजी प्रथम अपील केल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला

नाही अथवा यासंदर्भात त्यांचे म्हणणे स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर सुनावणीसाठी आज रोजी उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.०३.२००९ रोजी दिलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे, ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाचा विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तुकाराम आप्पाराव पास्टे,रा.मोठीवाडी, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,मोठीवाडी, ता.माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६८

निर्णय दिनांक ०३-०६-२०१०

१ श्री. भांबळे बाणाजी ज्ञानेश्वर, : अपिलार्थी
रा. सावंगी (भांबळे), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : सौ. सोमित्रा पांडुरंग ढगे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी आजपर्यंत त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिंतूर यांनी अपिलार्थीचे शपथपत्र आयोगास सादर केले आहे. या शपथपत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता लेखी माहितीची आवश्यकता नाही. त्यांनी आयोगाकडे नजरचुकीने अपील केले आहे. अपिलार्थीच्या या शपथपत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भांबळे बाणाजी ज्ञानेश्वर, रा. सावंगी (भांबळे), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६९

निर्णय दिनांक ०३-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख जावेद शे. इस्माईल,<br>रा. राजगल्ली, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत,<br>तालुका मानवत, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच तहसीलदार, मानवत तथा जन माहिती अधिकारी श्री. अरविंद नरसीकर यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक ०७-०५-२०१० रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी तहसील कार्यालय, मानवत येथे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत सन १९९३ ते २००८ या कालावधीतील मुस्लीम बेलदार जातीचे प्रमाणपत्र मिळालेल्या अर्जदारांची नावे अशी माहिती मागितली होती. ही माहिती त्यांना आता तहसीलदार, मानवत यांच्याकडून प्राप्त झाली असून त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी त्यांनी या पत्राच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे. तसेच या पत्रामध्ये त्यांनी प्राप्त माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याची कबुली देखील दिली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख जावेद शे. इस्माईल, रा. राजगल्ली, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४२

निर्णय दिनांक ०३-०६-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिंदे ज्ञानेश्वर पांडुरंग,<br>रा. साठेनगर, वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी नकार दिला व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही खुलासा केला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेली माहिती एकूण नऊ मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००६-०७ ते २००८-०९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पंचायत समिती, गंगापूर यांच्या सर्वसाधारण व मासिक सभेच्या सर्व ठरावाच्या प्रती, अंदाजपत्रकाच्या प्रती, वार्षिक प्रशासनिक अहवालाच्या प्रती, पंचायत समितीला योजनाव्दारे ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००९ या कालावधीत प्राप्त झालेला एकूण निधी, एकूण खर्च, खर्चाचे विवरण, या कालावधीतील बँक खात्याच्या स्टेटमेंटच्या प्रती, दिनांक ०१-०१-२००६ ते ३०-०४-२००९ या कालावधीत प्राप्त माहिती अधिकार अर्जाच्या प्रती, पंचायत समिती स्तरावर वेगवेगळ्या योजनेतून वैयक्तिक लाभ झालेल्या लाभार्थ्यांची नावे, पत्ते व लाभाचा प्रकार आणि पंचायत समिती कार्यालयास या कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व जी. आर. च्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ति असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ८ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने माहिती देण्यासाठी नकार या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१०-२००९ रोजी आदेश देऊन, या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील माहिती निरीक्षण करण्याची संधी देऊन, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसाच्या आत

पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती पाहण्यासाठी न जाता वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी एकूण ९ मुद्दयांव्दारे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ८ शी संबंधित माहिती फक्त प्राप्त झाली, उर्वरित ७ मुद्दयांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरीत प्राप्त व्हावी, अशी त्यांनी या युक्तिवादाच्या शेवटी अपेक्षा व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती तपासण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थी या माहितीची तपासणी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कधीही टाळले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्या दैनंदिन कामकाजाशी संबंधित आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सहजपणे उपलब्ध होऊ शकणा-या अशा स्वरुपाची आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ही माहिती लिखीत अथवा टंकलिखीत स्वरुपात आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी

यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदाराला अधिनियमातील तरतुदीनुसार देण्याच्यासंदर्भात कार्यवाही करण्याची प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे या प्रकरणी आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी लागेल, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ आणि ८ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ आणि ८ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिंदे ज्ञानेश्वर पांडुरंग, रा. साठेनगर, वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका

गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४३

निर्णय दिनांक ०३-०६-२०१०

१ श्री. अशोक गंगाधर नावकर / दसरथ आसाराम पगारे, : अपिलार्थी
रा. आनंदनगर, रेल्वेस्टेशन, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, बदनापूर तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल दाभाडीमध्ये झालेले सी. आर. चे काम झाले नसून देयके दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले

आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दाभाडी सर्कलमधील सी. आर. चे काम अंदाजपत्रक, बील, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती, अंदाजपत्रकाची दुसरी प्रत, वर्क ऑर्डरची प्रत आणि सी. आर. चे काम झाले असून याबाबत काम न होता बील देयकाबाबत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या ज्या उपविभागाशी संबंधित होती त्या उपविभागाकडे दिनांक २०-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली. उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, जालना यांनी त्यांच्या दिनांक १८-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६३० इतके त्यांना भरण्याचे सूचित करुन, शुल्क भरल्यानंतर माहिती देण्याचे आश्वासित केले. तथापि अपिलार्थीने त्याप्रमाणे कृती न करता, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०६-२००९ रोजी सुनावणी ठेवली असता सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिले, त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होऊ शकला नाही, परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे व ती सशुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले होते. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही आणि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवली असता सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित राहिले, त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देता आला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन या परिच्छेदासमोर ' C. R. चे काम झालेले असून त्याबाबतचे काम न होता बिल देयकाबाबत ' असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत. सदर अभिप्राय मोघम असून या अर्जाव्दारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चित कोणती माहिती अपेक्षित आहे याचा कोणासही बोध होणे शक्य नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेली माहिती म्हणून ज्या 'माहितीचे वर्णन' अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केले आहे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र याच अर्जामधील 'माहितीचा विषय' या मुद्दयासमोर अपिलार्थीने लिहिलेल्या अभिप्रायावरुन, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील दाभाडी प्रकल्पामधील झालेल्या सी. आर. च्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या,

बिलाच्या, मोजमाप पुस्तिकाच्या आणि वर्क ऑर्डरच्या प्रती हव्या असाव्यात असे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे व अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून, ही माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रथमतः भरावे व त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांकडून हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वर निर्देशित केलेली, त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व सशुल्क हस्तगत

करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक गंगाधर नावकर, रा. आनंदनगर, रेल्वेस्टेशन, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४४

निर्णय दिनांक ०३-०६-२०१०

१ श्रीमती शारदा सुजितकुमार तायडे / फुलवरे, : अपिलार्थी
एन-२,क्यू-१०/७, तथागत कॉलनी, सिडको, सुशिलादेवी
हायस्कूलच्या मागे, मुकूंदवाडी विभाग, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ' अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबत दिनांक ०६-०५-२००९ च्या

संदर्भान्वये आपण केलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा अहवाल मिळणेबाबत ' अशी माहिती 'स्वहस्ते' मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी म्हणणे त्यांच्या प्रतिनिधीमार्फत सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे संबधितांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे ३७० दिवसांकरिता प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे जास्तीत जास्त २५,००० रुपये इतकी शास्ती लावण्याचे आदेशित करावे आणि कलम २० (२) नुसार त्यांना लागू असलेल्या सेवाशर्तीनुसार कारवाई करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना आदेशित करावे तसेच या अर्जाच्या लेखी युक्तिवादाच्या अखेरीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ' स्वहस्ते ' अशा माध्यमाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी

दिनांक १५-०६-२००९ रोजी तयार करुन ठेवली होती, तथापि अपिलार्थी त्यांच्याकडे ही माहिती स्वहस्ते हस्तगत करुन घेण्यासाठी न आल्यामुळे त्यांनी दिनांक १५-०६-२००९ रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती खाजगी कुरिअर सेवेमार्फत विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. त्यांनी अपिलार्थीस ' द प्रोफेशनल कुरिअर, औरंगाबाद ' यांच्यामार्फत ही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज करताना त्यांना 'स्वहस्ते' माहिती अपेक्षित असल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, माहितीची व्यक्तिशः मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते आणि या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये 'स्वहस्ते' माहिती मागितली आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घेण्याची जबाबदारी ही अपिलार्थीची होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १५-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व ४७८ अन्वये नोटीस देण्यात आली आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि ही नोटीस महानगर-पालिकेने कोणास पाठविली आहे त्याचा उल्लेख या माहितीमध्ये नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०६-०५-२००९ च्या संदर्भान्वये जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांचा दिनांक ०६-०५-२००९ रोजीचा अर्ज महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या-पासून ते दिनांक २९-०५-२००९ पर्यंतच्या कालावधीत या विषयावर जन माहिती अधिकारी यांनी

संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व या विषयावर त्यांच्याकडील अभिलेख्यावरील उपलब्ध असलेल्या वरील कालावधीमधील टिपणीच्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील. ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत देण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्वहस्ते माहिती मागितली होती, परंतु ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी गेल्या याबाबतचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. या उलट अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खाजगी कुरिअर सेवेमार्फत माहिती पुरविल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतूने टाळाटाळ केली असल्याचे सिध्द होत नाही. परिणामी अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती शारदा सुजितकुमार तायडे / फुलवरे, एन-२,क्यू-१०/७, तथागत कॉलनी, सिडको, सुशिलादेवी हायस्कूलच्या मागे, मुकूंदवाडी विभाग, नवीन औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४५

निर्णय दिनांक ०३-०६-२०१०

१ श्री. शेख अब्बास कय्युम, : अपिलार्थी

रा. वाघळूज, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

त्रयस्थ पक्ष : कडा ग्रामोद्योग औद्योगिक बहुउद्देशीय सहकारी संस्था, मौजे कडा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, कडा ग्रामोद्योग औद्योगिक बहुउद्देशीय सहकारी संस्था, मौजे कडा यांच्यासंदर्भात डिसेंबर २००३ ते दिनांक ०८-०५-२००९ या कालावधीशी संबंधित एकूण १६ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६५ इतके त्यांना चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने आणि अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १०-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनाक २१-०७-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०७-२००९ रोजी त्रयस्थ पक्षाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष चेअरमन, कडा ग्रामोद्योग औद्योगिक बहुउद्देशिय सहकारी संस्था उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८, ९ व १६ च्या संदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना त्रयस्थ पक्षाकडून ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध झाली त्या

स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस दिनांक ३१-०७-२००९ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली ही माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

त्रयस्थ पक्षाने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे अभिप्राय दिले आहेत की, त्यांच्या संस्थेविषयी मागितलेली माहिती उघड केली असता श्री. दैवशाला बबन शिरोळे, बबन मल्हारी शिरोळे, कृष्णा बापुराव जाधव व नारायण बाबुराव राऊत ही मंडळी या माहितीचा दुरुपयोग करुन खंडणीची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थीने केवळ माहिती अधिका-यास व संबंधित संस्थेस त्रास देण्याच्या उद्देशाने ही माहिती मागितली आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, जिल्हा बीड यांच्याकडे कडा ग्रामोद्योग औद्योगिक बहुउद्देशीय सहकारी संस्था, मौजे कडा या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थेच्या संदर्भात माहिती मागितली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या कोणत्याही सहकारी संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत, असा निर्वाळा मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ३६४८/२००७, श्री. बालाजी कॉ. ऑप स्पिनींग मिल्स लि. रिसोड, जिल्हा वाशिम विरुध्द राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, नागपूर यासंदर्भात दिनांक ०२-०३-२००९ रोजी दिलेला आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाकडे मागणी केलेली माहिती त्यांना माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय असणार नाही. मात्र संबंधित त्रयस्थ पक्षाची सहकार विभागामार्फत नोंदणी झाली असल्यामुळे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नियमित स्वरुपात जी कागदपत्रे सादर करणे त्यांना नोंदणीतील अटीनुसार भाग आहे, अशा सर्व कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाखाली प्राप्त करुन घेता येतील. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात, संबंधित संस्थेने खाते पुस्तकाच्या पृष्ठभागाची फक्त एकाच पानाची प्रत दिल्याचे आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात त्रयस्थ पक्षाने त्यांच्या संस्थेची दिनांक ०८-०५-२००९ पर्यंतची माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास अवगत करुन ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ शी संबंधित माहिती अर्धवट मिळाली आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांना संबंधित संस्थेकडून डिसेंबर २००४ ते दिनांक ०८-०५-२००९ पर्यंत ऑडिट रिपोर्टच्या सर्व प्रती आवश्यक असताना त्यांना २००६ पर्यंतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली. यावर जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, संस्थेचे सन २००६ पासूनच्या कालावधीचे ऑडिट नुकतेच पार पडले गेले असून या रिपोर्टच्या प्रती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ते ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. संस्थेने त्यांच्या दर वर्षाच्या ऑडिट रिपोर्टच्या प्रती सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे सादर करणे हे संस्थेला महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून सार्वजनिक स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय असू नये. त्याप्रमाणे आज त्रयस्थ पक्षाने

सुनावणीच्या वेळी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक १६ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले आहे की, या संस्थेसंबंधी कोणतेही शासकीय आदेश निर्गमीत झाल्याचे त्यांच्याकडील अभिलेख्यावरुन त्यांना आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या मुद्दयावरील ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील परिच्छेदात अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची माहिती आणि अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८, ९ व १६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८, ९ व १६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख अब्बास कय्युम, रा. वाघळूज, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४६

निर्णय दिनांक : ०४.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती वैशाली भास्कर पोटींदे,<br>रा. औरंगाबाद. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>सिडको कार्यालय,औरंगाबाद | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रशासक,<br>सिडको कार्यालय,औरंगाबाद | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १)वरिष्ठ नियोजनकार (न.रा.),
सिडको, नवीन औरंगाबाद.
२) सहायक पणन अधिकारी,
सिडको,नवीन औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. सोनवणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील एन-६, सिडको,औरंगाबाद मधील प्लॉट नं. ३५-३६ वर राहत

असलेल्या श्री. सोनवणे यांचा या प्लॉटशी काय संबंध? सदर प्लॉट विक्रीयोग्य आहे काय? असल्यास त्या प्लॉट नं. ३५ व ३६ चे क्षेत्रफळ किती व किंमत काय? अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या भूखंडांचे क्षेत्रफळ कळवून, सदरील प्लॉट सिडकोच्या मालकीचे व सिडकोच्या ताब्यात असून दोन्ही भूखंडाबाबत सिडकोमध्ये दि. २४.०४.२००९ रोजी कोणताही वाद चालू नाही, अशी माहिती अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने आणि ती चुकीची असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. ३०.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सदर भूखंडाचा प्रचलित दर रु. २५३०/- प्रति चौ.मी. असल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले की, त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्लॉट नं. ३५ व ३६ वर श्री. सोनवणे हे अनधिकृत बांधकाम करुन राहत आहेत. अपिलार्थी यांच्या एकूण युक्तिवादावरुन त्यांना सदरील अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याचे आयोगाने सिडकोला आदेशित करावे, असे अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०४.२००९ व २८.०५.२००९ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या भूखंडावर श्री. सोनवणे यांनी ७ X ५ फूट इतक्या आकारमानाचे विनापरवानगी बांधकाम केले असून सदरील बांधकाम काढून टाकण्यासाठी त्यांनी दि. ११.०३.२००८ रोजी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ कलम क्र. ५५ (१) मधील तरतुदीनुसार, संबंधितांना नोटीस दिलेली आहे. यासंदर्भात त्यांनी संबंधित व्यक्तीवर पोलीस केस केली असता, त्या केसचा निकाल सिडकोच्या विरुध्द लागला, असेही आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या एकूण ४ मुद्यांमधील माहितीपैकी, श्री. सोनवणे यांचा प्लॉट नं. ३५ व ३६ शी काय संबंध ? या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलची स्पष्टीकरणे आणि खुलासे अर्जदारास देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. तथापि या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये श्री. सोनवणे यांनी या भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याचे कबूल केले आहे व त्यांनी सदरचे बांधकाम काढण्याबाबत विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन च्या १९६६ मधील कलम ५५(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०३.२००८ रोजी नोटीसही बजावली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस एन-६ सिडको येथील या प्रकरणातील सद्यस्थिती, प्लॉट नं. ३५ व ३६ वर झालेल्या अनधिकृत बांधकामाची माहिती देण्याच्या दृष्टीने या नोटीसची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०४.२००९ व २८.०५.२००९ रोजीच्या पत्रांद्वारे पुरविलेली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्लॉटची किंमत विचारली आहे. तथापि प्रत्येक प्लॉटची किंमत ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे लिखित स्वरुपात उपलब्ध नाही. त्यांनी या प्लॉटचा सिडकोने ठरविलेला दर आणि प्लॉटचे क्षेत्रफळ अपिलार्थीस कळविले आहे. या दोन्ही परिमाणावरुन अपिलार्थी या प्लॉटची किंमत काढून घेऊ शकतात. अशाप्रकारे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्लॉट क्र.३५ व ३६ वर झालेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भातील माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली पूरक माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली पूरक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती वैशाली भास्कर पोटींदे,प्लॉट नं. ५, किर्ती हौसिंग सोसायटी,एन-८, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ नियोजनकार (न.रा.),सिडको, नवीनऔरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सहायक पणन अधिकारी,सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक,सिडको,नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४७

निर्णय दिनांक : ०४.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर,<br>रा. औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त,<br>पशु वैद्यकीय सर्वचिकित्सालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी व अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीच्या सहमतीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णपणे माहिती द्यावी, असा निर्णय दिला. तथापि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिलेली आहे. पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,औरंगाबाद यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी संगनमत करुन कार्यालयाच्या परिसरातील झाडे तोडली व परस्पर विक्री केली. या कार्यालयाकडे त्यांच्या ताब्यात असलेले 'इमारत रजिस्टर' सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या सूचनांनुसार ठेवले जात नाही. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो बऱ्याच मुद्यांची माहिती येणे बाकी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १०.०६.२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये मुद्दा क्र. १ द्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून या मुद्याद्वारे अपिलार्थीने, त्यांना निश्चितपणे कोणत्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयास सन २००४ ते २००९ पर्यंत उपलब्ध करुन

देण्यात आलेल्या आर्थिक तरतुदी कळविल्या आहेत. तथापि या तरतुदींच्या उपयोगिता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या नाहीत. यासंदर्भात या प्रती बांधकाम विभागाकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्या नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी या मुद्यासंदर्भात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत बांधकाम विभागास, अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती न केल्यामुळे या मुद्यावरील माहिती त्यांना आता बांधकाम विभागाकडून स्वतः प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अधिनस्त असलेल्या निवासस्थानांची संख्या, बांधकामाचे वर्ष, बांधकामाचे नकाशे अशी माहिती विचारली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.०६.२००९ रोजी प्रत्येक इमारतीचे बांधकाम कोणत्या वर्षी झाले आहे, याची माहिती दिली आहे तथापि निवासस्थानाची एकूण संख्या या मुद्याच्या संदर्भातील माहिती, अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या माहितीमध्ये समाविष्ट नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. बांधकामाचे नकाशे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील बांधकाम विभागाकडे उपलब्ध नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस मिळू शकणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे, 'निवासस्थानाचा घसारा किंमत', ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावी व नंतर ती अपिलार्थीस द्यावी, अशी मागणी, अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे त्यांच्या अधिनस्त असलेल्या बांधकामाच्या घसारा

किंमतीबाबतचे कोणतेही अभिलेखे ठेवले जात नाहीत, असे आयोगास अवगत केले. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थी म्हणतील त्या स्वरुपात नव्याने माहिती तयार करुन ती अर्जदारास पुरविणे, हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जर ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर ती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे त्यांच्या कार्यालयाचा सन २००४ ते २००९ या कालावधीचा प्रशासकीय तपासणी अहवाल व त्याचा अनुपालन अहवाल, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे सन २००४-०९ या कालावधीच्या प्रशासकीय तपासणी अहवालाच्या प्रती व एका वर्षाच्या अनुपालन अहवालाची प्रत, अशी माहिती अपिलार्थीस पुरविली असल्याचे दिसून येत आहे. तथापि उर्वरित वर्षाचे अनुपालन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अद्यापपावेतो केलेले नाही. त्यामुळे याबाबत अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही, असा युक्तिवाद जन माहिती अधिकारी यांनी केला आहे. अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी, उर्वरित कालावधीच्या वार्षिक तपासणी अहवालाचे अनुपालन त्यांनी केले नसल्याची बाब अपिलार्थीस कळविली नाही, ही माहिती त्यांना आता अपिलार्थीस या मुद्यासंदर्भातील माहिती म्हणून कळवावी लागेल. मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडें सन २००४-०८ मध्ये महालेखाकार, नागपूर यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या केलेल्या लेखा परीक्षणामध्ये नमूद केलेल्या पाणीपट्टी वसूलीच्या संदर्भात सदर पाणी पट्टी कोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याकडून

केली आहे व पाणी पट्टीची रक्कम, अशी माहिती विचारली आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याकडून काही पाणीपट्टी वसूल केली आहे व ही माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १०.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४-०९ या कालावधीत त्यांच्या कार्यालयात असलेल्या हिरव्या झाडांची संख्या, यापैकी तोड करण्यात आलेल्या झाडांची संख्या, वन विभागाकडून घेतलेल्या परवानगी पत्राची प्रत व कोषागारात भरलेल्या रकमेचा तपशील, चलन क्रमांक व दिनांक अशी माहिती विचारली आहे. याबाबत स्पष्ट करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने झाडे तोडलेली नाहीत. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे अशाप्रकारची वृक्षतोड झाली आहे किंवा कसे, याबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही अथवा यासंदर्भात कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीस ती प्राप्त होणार नाही, तथापि अपिलार्थीच्या मते पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ही वृक्षतोड करुन वृक्षतोडीप्रीत्यर्थ प्राप्त झालेल्या निधीचा,ती शासकीय कोषागारामध्ये जमा न करता, अपहार केला आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी या मुद्यासंदर्भातील त्यांची तक्रार त्यांना आवश्यक वाटल्यास,पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडे आवश्यक त्या पुरावासह करावी, जेणेकरुन त्यांच्या तक्रारीची तड लागू शकेल. अपिलार्थीने त्यांच्या आजच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला हा मुद्दा पूर्णतया प्रशासकीय असून अशाप्रकारच्या प्रशासकीय बाबीमध्ये निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नाही. त्यामुळे

अपिलार्थीस अपेक्षित असलेली, त्यांच्या अर्जातील, या मुद्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही आयोग आदेशित करीत नाही.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना आता देय असलेली उर्वरित माहिती, याचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली, अपिलार्थीस देय असलेली त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर,द्वारा- प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,खडकेश्वर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४८

निर्णय दिनांक : ०४.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुडदे प्रकाश विठ्ठलराव,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी,<br>अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>वरिष्ठ संशोधन अधिकारी,<br>अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>औरंगाबाद. | | |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र
तपासणी समिती,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०४.०६.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १३४८/०८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने,अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १३४८/०९, दिनांक १२.०८.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कुडदे प्रकाश विठ्ठलराव,रा.माऊली निवास, संभाजी नगर, नगर रोड, बालेपीर,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४९

निर्णय दिनांक : ०४.०६.२०१०

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी,
नगर पालिका प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, नगरपालिका प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद, जालना

जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी,
नगर परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०८.०५.२००९ रोजी देण्यात आलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे म्हटले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०४.०६.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी स्थळ दर्शवून त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविल्याचे व प्राप्त माहितीने समाधान झाले असल्याने ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत, असे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३४९/०९, दिनांक १७.०७.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी,घर नं. २.२०.१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड,काद्राबाद, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५०
निर्णय दिनांक : ०४.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी. ए. देशमुख,रा. जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, जाफ्राबाद,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षकांच्या राहत्या घराचे भाडे, घर मालकाचे नाव, दिलेल्या भाड्याच्या पावत्या, स्वस्त धान्य दुकानाच्या कार्डाची झेरॉक्स, त्यांना मिळणारा घरभाडे (भत्ता) व त्यांचे निवासस्थान ते शाळा यामधील अंतर, ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु. २९५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे यासंदर्भात दि. १२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थी सुनावणीसाठी गैरहजर राहिल्यामुळे त्यांना या माहितीची आवश्यकता नसावी, अशा निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. तथापि त्यांनी या निर्णयाची प्रत अपिलार्थीस पाठविली नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस संबंधित जन माहिती  व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी तयार आहेत. या प्रकरणी अद्यापपावेतो अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न भरल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या

दि. ३०.०३.२००९ रोजीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे योग्य तो प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७(३)(क) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील देखील कळविला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे हे त्यांचे कर्तव्य असते, त्याचबरोबर अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे भरणे हे अर्जदाराचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७(५) मध्ये विहित केलेले, माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांचे कर्तव्य पार पाडले नसल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०४.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. डी. ए. देशमुख,रा.देहडकरवाडी, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५१

निर्णय दिनांक : ०४.०६.२०१०

१. श्री. दिनेश शिवलाल राठोड, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक,
विशेष जिल्हा समाज कल्याण
अधिकारी कार्यालय,जालना.

त्रयस्थ पक्ष : श्री. शिवाजी पोस्ट बेसिस प्राथमिक व
माध्यमिक आश्रमशाळा, शिवणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही, त्यामुळे त्रयस्थ पक्ष तथा मुख्याध्यापक, श्री शिवाजी पोस्ट बेसिस प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शिवणी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन संस्थाचालक व संपूर्ण शाळेची चौकशी करुन या शाळेवर प्रशासक नेमण्यात यावा, या अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जालना यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्री शिवाजी पोस्ट बेसिस प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शिवणी या शाळेसंदर्भात काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित शाळेने माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ४ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द केलेल्या १ ते १७ नमुन्यातील मुद्देनिहाय माहिती, सदर संस्थेमध्ये असलेल्या गोपनीय माहितीची यादी व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जालना यांच्या कार्यालयातील जा.क्र.२०९ दि. २७.०१.२००३ या पत्राची झेरॉक्स प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, "स्वतः" अशी अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. २७.०४.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी निःशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे कधीही उपस्थित झाले नाहीत.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली होती. तथापि अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या शाळेमध्ये कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी आजही तयार आहेत.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः'माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे हे उत्तरदायित्त्व योग्यप्रकारे पार पाडले असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती घेण्यासाठी उपस्थित राहिल्याच्या त्यांच्या पुराव्याची मागणी आयोगाने त्यांच्याकडे केली असता, अशाप्रकारचा कोणताही पुरावा अपिलार्थीस आयोगासमोर सादर करता आला नाही. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय यांनी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत, असा आयोगास खुलासा केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली एकूण तीन मुद्यावरील माहितीपैकी दोन मुद्यावरील माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून एका मुद्यावरील माहिती (मुद्दा

क्र. ३) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जालना यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित आहे. यापैकी त्रयस्थ पक्षाकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दोन मुद्यावरील माहिती तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी तयार आहेत. मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या पत्राचा संदर्भ दिला आहे ते पत्र मूळात अस्तित्त्वात आहे किंवा कसे या बाबत अपिलार्थीकडे एखादा संदर्भ अथवा इतर पुरावा उपलब्ध आहे काय, अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी अशाप्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी या पत्राची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. ३ मध्ये निर्देशित केलेले संदर्भिय पत्र मूळात अस्तित्त्वात आहे किंवा कसे, हे आयोगास आढळून आले नाही. सदरचे पत्र अस्तित्त्वात असल्याबाबतचा कोणताही सबळ पुरावा अपिलार्थी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात मागणी केलेली माहिती त्यांना आता उपलब्ध होऊ शकणार नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व सशुल्क पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी

यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व सशुल्क हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्रयस्थ पक्षावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज करताना तो विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना उद्देशून केला आहे आणि त्रयस्थ पक्षाने त्यांच्या दि. २३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारलेले नाही. या उलट, अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. हे पाहता अपिलार्थीची त्रयस्थ पक्षावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई आदेशित करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनेश शिवलाल राठोड,रा. सहजीवननगर, विठ्ठल-रुख्मिणी मंदिराजवळ, अंबड नाका, जालना-४३१२१३.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

## अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५२

निर्णय दिनांक ०४-०६-२०१०

१ श्री. पठाण साजीदखान पिता अब्दुल मजीदखान, : अपिलार्थी

औरंगाबाद-जालना हायवे रोड, बदनापूर, तालुका बदनापूर,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा माहिती कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा संचालक (माहिती) माहिती व जनसंपर्क

महासंचालनालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा माहिती अधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून दिनांक १३-०५-२०१० रोजी लिहिलेले पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले

आहे की, आज रोजी त्यांच्या विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याने ते विचाराधीन अपील क्रमांक १३५२/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जाच्या अखेरीस त्यांनी आयोगास त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील रद्द करण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पठाण साजीदखान पिता अब्दुल मजीदखान, औरंगाबाद-जालना हायवे रोड, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (माहिती) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५३

निर्णय दिनांक ०४-०६-२०१०

१ श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, : अपिलार्थी
कोल्हेर रोड, नगरपरिषद कॉलनी, गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील आस्थापनेसंदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विमा हप्ता व पतसंस्था सभासद (दरमहा) का कपात केली नाही या विषयी माहिती, सहाव्या वेतनापोटी दिलेल्या अग्रिमाची अपिलार्थीच्या पगारातून कपात करण्याची कारणे, मंजूर पदांची संख्या, अस्तित्वात असलेली पदे, व्यपगत झालेली व होणारी पदे, प्रतिनियुक्ती कर्मचारी, प्रतिनियुक्ती होण्याचे प्रयोजन, मूळ पद सोडून इतरत्र काम करणारे कर्मचारी, इतरत्र काम देण्याचे प्रयोजन त्याबाबत अधिनियमात असलेल्या तरतुदी व या संचिकेच्या, टिपणीच्या प्रती आणि सहावा वेतन अग्रिम कपात केलेली रक्कम त्यांना परत देण्यात यावी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०५-२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले व या आदेशाव्दारे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचा आणि ती देण्यासाठी हेतुपुरःस्सर टाळाटाळ केली नसल्याचा निष्कर्ष काढून त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. परंतु या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. यानंतर माहिती न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असून, त्यांना अद्यापपावेतो मुद्दा क्रमांक ३ मधील, प्रतिनियुक्ती करण्याचे प्रयोजन व मुद्दा क्रमांक ४ मधील, मूळ पदावरील काम सोडून इतरत्र काम करण्याबाबत अधिनियमातील तरतुदी आणि संबंधित कर्मचा-यांच्या या विषयावरील संचिकांच्या व टिपणीच्या प्रती, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, एकूण पाच मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १, २ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून, या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षिली आहेत व तसेच निश्चितपणे कोणाच्या पगारातून विमा हप्ता, पतसंस्था सभासद हप्ता कपात केलेला नाही याचा कोणताही उल्लेख त्यांनी या मुद्दयामध्ये केलेला नाही. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्रमांक २ व्दारे देखील अपिलार्थीने, 'सहाव्या वेतनापोटी त्यांना देण्यात आलेल्या अग्रिमाची वसुली त्यांच्या पगारातून का केली,' अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती

मागितली आहे. अशा प्रकारची माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मागितली नसून, त्यांनी या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून सहाव्या वेतनाच्या अग्रिमापोटी त्यांच्या पगारातून कपात करण्यात आलेली रक्कम त्यांना परत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना केलेली विनंती आहे. कोणत्याही प्रकरणासंदर्भात अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली विनंती हा 'माहिती'चा विषय होऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीस याही मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील प्रतिनियुक्ती होण्याचे प्रयोजन व मुद्दा क्रमांक ४ मधील मूळ पद सोडून इतरत्र काम देण्याचे प्रचलीत नियम व तदनंतर प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचा-यांच्या संचिकांच्या व टिपणीच्या प्रती, या मुद्दयावरील माहितीचा त्यामध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील अद्याप-पावेतो अपिलार्थीस द्यावयाची राहिलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, कोल्हेर रोड, नगरपरिषद कॉलनी, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५४

निर्णय दिनांक ०४-०६-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. सुरेखा चंपतराव पाटील,<br>रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,<br>अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका<br>अर्धापूर, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. नासेर खाँ जाफर खाँ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागवूनही माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक १४-०५-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांनी मुदत

संपूनही माहिती देण्यास विलंब लावला व टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. नासेर खाँ जाफर खाँ अर्धघाऊक रॉकेल विक्रेते, अर्धापूर यांना शासनाकडून मिळणा-या रॉकेलच्या के. एल. प्रमाणे त्यांचे स्टॉक रजिस्टर व वितरण रजिस्टर सत्यप्रती, त्यांनी वाटप केलेल्या रॉकेल वाटप नोंदवहीच्या सत्यप्रती व पुरवठा निरीक्षक किंवा तलाठी यांनी तपासणी केलेल्या मासिक तपासणीच्या अहवालाच्या सत्यप्रती, अशी सन २००० ते २००८ या कालावधीमधील माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १५-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही आणि तदनंतर दिनांक १९-०६-२००९ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर तहसीलदाराने सुनावणी घेणे गरजेचे असताना प्रत्यक्षात नायब तहसीलदाराने सुनावणी घेतली असल्यामुळे, त्यांनी सुनावणीच्या वेळी माहिती अधिका-याने देऊ केलेली माहिती घेण्यास नकार दिला. यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली ती अर्धवट आहे. त्यांनी सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असता या माहितीमध्ये सन २००६ ते २००८ या कालावधीतील माहितीचा समावेश नाही. तसेच त्यांनी अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. नासेर खाँ जाफर खाँ यांच्याकडील स्टॉक रजिस्टरच्या प्रतीची माहिती मागितली असता त्यांना किरकोळ विक्रेत्याच्या प्रती, किरकोळ विक्रेत्याची माहिती पुरविली आहे. या माहितीची अपिलार्थीस आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी निश्चितपणे कोणती माहिती पुरविली याची आयोगाने विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती दाखवू शकले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे देणे अथवा या माहितीकरिता लागणारे आवश्यक शुल्क कळविणे भाग होते. तथापि या दोनही पर्यायांपैकी त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त होऊ शकली नाही. यानंतर अपिलार्थीने तहसीलदाराकडे अपील केले असता, तहसीलदार यांनी गावतंटा मुक्ती तपासणीसाठी दौ-यावर जाण्याचे कारण पुढे करुन नायब तहसीलदारास अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी घेण्याचे

सूचित केले. तहसीलदार, अर्धापूर यांची अशा प्रकारची कृती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ ची खिल्ली उडविणारी आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. स्वतःवरील वैयक्तिक जबाबदारी टाळून या प्रकरणी तत्कालीन तहसीलदार, अर्धापूर श्री. संतोष वेणीकर यांनी आपल्या बेजबाबदार कार्यशैलीची प्रचिती येथे या प्रकरणी आणून दिली आहे. सबब, सचिव (महसूल) यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी तत्कालीन तहसीलदार, अर्धापूर श्री. संतोष वेणीकर यांनी आपली जबाबदारी का टाळली याचे स्पष्टीकरण मागवून घ्यावे व यासंदर्भात आवश्यक वाटल्यास त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद तर दिला नाहीच, परंतु त्यानंतर विलंबाने अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (महसूल) यांना संबंधित तत्कालीन नायब तहसीलदार, अर्धापूर जिल्हा नांदेड श्री. बिंगेवार यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची राहिलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित तत्कालीन नायब तहसीलदार, अर्धापूर, जिल्हा नांदेड श्री. बिंगेवार यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५५

निर्णय दिनांक ०४-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. टेकाळे शेषराव एकनाथ,<br>रा. पो. कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर मुदतीत निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, किनवट यांच्याकडे, कुपटी (मा.), किनवट/माहूर येथील केंद्रीय प्राथमिक शाळेच्या संदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कुपटी (मा.) किनवट/माहूर येथील (आनंतवाडी) या शाळेची स्थापना केव्हा झाली, शाळेच्या जागेची मालकी कोणाची होती, ती जागा कुणी कशा प्रकारे दिली, जागेचे एकूण क्षेत्रफळ व ग्रामपंचायतीच्या कार्यालयातील नोंदीप्रमाणे जागेच्या चतु:सीमा व शाळा बांधकामाच्या वेळी बांधकामाचे क्षेत्र दाखविलेल्या नकाशाची कागदपत्रे - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट विकास अधिका-यांशी संबंधित नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक ११-०२-२००९ रोजीचा अर्ज गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांच्याकडे दिनांक १७-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. सदरचा अर्ज गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १८-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती किनवट तालुक्यातून माहूर तालुका हा नव्याने निर्माण झाला असल्यामुळे दिनांक ०१-०४-२००४ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्या कार्यालयास हस्तांतरीत केली असल्याचे अपिलार्थीस कळविले व या माहितीकरिता गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना दिली. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०५-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी अपिलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड आहेत हे माहीत असताना देखील गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे पाठविला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही. अशा प्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ज्या शाळेशी संबंधित माहिती मागितली आहे ती शाळा माहूर पंचायत समितीच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे दिनांक १८-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले होते. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद का पाठविला नाही असे आयोगाने विचारले असता, त्यांना यासंदर्भात कोणताही समाधानकारक खुलासा आयोगास करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांच्याकडून दिनांक १७-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील कलम ६ (३)

(एक) प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे होते. त्यांनी पंचायत समिती कार्यालयाकडून त्यांना प्राप्त झालेला अपिलार्थीचा प्रथम अर्ज, सदर अर्ज त्यांना पंचायत समिती, किनवटकडून प्राप्त झाल्या-नंतर पाच दिवसाच्या आत, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता त्यांनी अपिलार्थीस गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडून आवश्यक असलेली माहिती परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०५-२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांच्याकडे प्रथम अपील केले. जे या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी नव्हते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे पाठविणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचा दिनांक ०५-०५-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज स्वत:कडे विनाकार्यवाही तसाच ठेवला. या सर्वांचा परिणाम अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न होण्यामध्ये झाला. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट हे मुख्यत्वे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधून ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर मधील संबधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी. या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट श्री. बलदेवसिंग चव्हाण यांनी अपिलार्थीस या प्रकरणी कोणतीही माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे

आणि आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. तथापि श्री. बलदेवसिंग चव्हाण हे आता शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे आयोगाचे कोणतेही आदेश नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. टेकाळे शेषराव एकनाथ, रा. पो. कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५६

निर्णय दिनांक ०४-०६-२०१०

१ श्री. वाघमारे संदेश गोविंदराव, : अपिलार्थी

मु. औराळा, पो. सालेगांव, तालुका नायगांव (खै.),

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा पोलीस उप अधीक्षक, उपविभागीय कार्यालय,

बिलोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर

केले आहे.  या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "ॲक्ट्रोसिटी ॲक्ट ३ (१) (१०) अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा भा. द. वि. ३२३, ५०६, ३४ अन्वये एफ. आय. आर. नं. १३/०८ गुन्हा दाखल करण्यात आला आहे," या विषयावर काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आरोपींना अटक करण्यात आली नाही तर का, फिर्यादीने दिलेल्या जबाबाची माहिती, साक्षीदाराने दिलेल्या जबाबाची माहिती व ॲक्ट्रोसिटी ॲक्टचा अटक करण्याचा अंतिम कालावधी - या मुद्दयांचा समावेश होता.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००९ रोजी सुनावणी घेतली.  सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा अति. पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या उपस्थितीत उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीस माहिती दिली.  तथापि त्याच दिवशी संध्याकाळी अपिलार्थीने त्यांना सकाळी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांना परत केली.  अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या वर्तनावरुन जन अपिलीय अधिकारी हे, अपिलार्थीस त्यांना त्यांच्या अपिलाची माहिती स्वीकारण्यात कुठलेच स्वारस्य नसून फक्त शासकीय यंत्रणेचा वेळ वाया घालवावायचा असल्याच्या, निष्कर्षाप्रत आले आणि त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला.  जन अपिलीय अधिकारी यांच्या या

निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी सकाळी ११-३० वाजता सुनावणीच्या वेळी व्यक्तिशः दिली, तथापि त्याच दिवशी संध्याकाळी ०६-०० वाजता अपिलार्थीने त्यांना सकाळी प्राप्त झालेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत केली. अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती देऊ केली होती याचे आयोगाने अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ४ मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने, आरोपींना अटक न करण्याची कारणे अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागता येणार नाही. कारण अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. मात्र उर्वरित ३ मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिका-याने या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर नकार दिलेला नाही, उलट जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने प्रथमतः ती स्वीकारली आणि नंतर ती माहिती परत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत केली. अपिलार्थीची ही कृती निश्चितपणे, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना स्वारस्य नसावे अशा जन अपिलीय अधिकारी यांच्या निष्कर्षाशी पूरक अशी आहे. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पुनश्च संधी देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, जिल्हा नांदेड यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भातील ही माहिती विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाघमारे संदेश गोविंदराव, मु. औराळा, पो. सालेगांव, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५७

निर्णय दिनांक ०४-०६-२०१०

१ श्री. एस. एस. जाधव, : अपिलार्थी

पटेलनगर, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड

त्रयस्थ पक्ष : लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो, त्यांनी दिनांक २१-०४-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या जी. पी. एफ. च्या पावत्या न मिळाल्यामुळे आणि त्यांना प्राप्त झालेली माहिती व्यथित करणारी असल्यामुळे त्यांनी, विचाराधीन

अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, विस्तृत व्याप्ती असलेली जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यासंदर्भात सन २००८-०९ या कालावधीशी संबंधित काही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पाचही मुद्दयांवरील माहिती त्यांना दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने आणि ती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०७-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत सन २००८-०९ या कालावधीशी संबंधित भविष्यनिर्वाह निधी विवरणपत्राच्या प्रती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या मुदतीत अपिलार्थीस त्यांच्या भविष्यनिर्वाह निधी विवरणपत्राच्या प्रती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना सह संचालकाच्या कार्यालयातून त्यांच्या पगारातून वजावट करण्यात येत असलेल्या भविष्यनिर्वाह निधीसंदर्भातील

वार्षिक विवरणपत्राच्या प्रती नियमीतपणे प्राप्त होत नाहीत. त्यांना प्राप्त झालेल्या विवरणपत्रामध्ये चुकीच्या रकमा दाखविल्या जातात. या प्रकरणी त्यांनी त्यांच्या स्वतःच्या वार्षिक विवरणपत्राची माहिती मागितली असता, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०८-२००९ रोजी म्हणजे ८४ दिवसांच्या विलंबाने प्राप्त झाली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मराठवाडा विभागातील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली हे चार जिल्हे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये आहेत. या चार जिल्ह्याच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या पगारातून वजावट करण्यात येत असलेल्या भविष्यनिर्वाह निधीच्या रकमेचे संनियंत्रण त्यांच्या कार्यालयामार्फत केले जाते. काही वर्षापूर्वी त्यांच्या कार्यालयाच्या काही कर्मचा-यांनी भविष्यनिर्वाह निधीच्या रकमेचा अपहार केल्याचे प्रकरण घडल्यामुळे त्यांच्याकडे या विषयीची माहिती काहीशी विस्कळीत झाली होती. तथापि आता त्यांनी ती माहिती संबंधित महाविद्यालयाच्या मदतीने ब-याच प्रमाणात व्यवस्थित करत आणली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयाकडून भविष्यनिर्वाह निधीच्या प्रती संबधितांना दरवर्षी देता आल्या नाहीत. तथापि यातील अंदाजे ५० % काम आता पूर्ण झाले असून या विवरणपत्राच्या प्रती त्यांना पुढील काही कालावधीमध्ये सर्व संबंधितांना पुरविता येणे शक्य होईल. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या स्वतःच्या भविष्यनिर्वाह निधीच्या विवरणपत्राची प्रत माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत मागितली होती ती प्रत त्यांना त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक १८-०८-२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक २१-०४-२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्षात दिनांक २७-०४-२००९ रोजी प्राप्त झाला आहे. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित तरतुदीमध्ये प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीचा या माहितीवर आक्षेप असा होता की, त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या विवरणपत्राची प्रत त्यांना, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ' भविष्यनिर्वाह निधी खाते क्रमांक १३३४ मध्ये माहे मार्च २००९ अखेर रुपये १,६८,७५८ जमा आहेत ' असे कळविले आहे. तथापि यासोबत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस भविष्यनिर्वाह निधीचे वार्षिक विवरणपत्र जोडले नाही, कारण त्यावेळी ते वितरीत करण्याचे काम चालू होते आणि या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे विवरणपत्र सदरचे काम पूर्ण होताच देण्याचे आश्वासित केले होते. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, प्रत्यक्षात कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे विवरणपत्र नियमीतपणे संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने देणे ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय अखत्यारितील बाब आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या वार्षिक विवरणपत्राच्या स्थितीबाबत दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कल्पना दिलेली आहे. यावरुन जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांच्याशी संबंधित प्रशासकीय बाबीवर आयोगाकडून निर्णय अपेक्षित करण्याची अपिलार्थीची अपेक्षा चुकीची आहे. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या वार्षिक विवरणपत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००९ रोजी, यासंदर्भातील त्यांचे काम पूर्ण होताच दिलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारच्या वैयक्तिक बाबीचा, ज्या बाबीशी इतर प्रशासकीय बाबी निगडीत आहेत अशी, जन माहिती

अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या विवरणपत्राशी संबंधित माहिती या प्रकरणी मुदतीत दिली गेली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या भविष्यनिर्वाह निधीचे वार्षिक विवरणपत्र नियमीत मिळणे आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार नंतर प्राप्त होणे, या दोनही बाबी भिन्न आहेत. अपिलार्थीस जर सदरची विवरणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून नियमीतपणे मिळत नाहीत अशी त्यांची तक्रार असेल तर, त्यांनी ही बाब शिक्षण विभागाच्या सक्षम प्राधिकरणाच्या नजरेस आणून आपल्या अडचणीचा निपटारा त्यांच्याकडून करुन घ्यावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या विवरणपत्रावरील, अपिलार्थीने आपले आक्षेप युक्तिवादामध्ये नोंदविले आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीमध्ये दर्शविण्यात आलेली रक्कम ही चुकीची आहे. यासंदर्भात देखील अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदाराला देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. भविष्यनिर्वाह निधीच्या वार्षिक विवरणपत्रासंदर्भात जर त्यांचे काही आक्षेप असतील तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी अथवा इतर सक्षम प्राधिकरणाशी संपर्क साधून त्या आक्षेपाचा परस्पर निपटारा करुन घ्यावा. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या प्रशासकीय बाबीवर निर्णय देण्याची अधिकारीता आयोगास नाही असे येथे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील परिच्छेदाचे अवलोकन केले असता, या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.	अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एस. एस. जाधव, पटेलनगर, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५८
निर्णय दिनांक : ०५.०६.२०१०

१. श्री. सुखदेव मराजी मोरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विद्युत वितरण कंपनी कार्यालय, ज्युब्ली पार्क,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
विद्युत वितरण कंपनी,शहर विभाग, ज्युब्ली पार्क,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र. १, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र.१, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील पी.सी. क्र. ५/१४/१०९३/०४५१ वर असलेल्या कनेक्शनधारकांची नावे, त्यांना कोणत्या प्रमाणपत्राआधारे विद्युत पुरवठा करण्यात आला, व्यावसायिक व घरगुती ग्राहकांची नावानिशी यादी, सुरुवातीपासून कनेक्शन दिल्यापासून ते आजपर्यंत नावे,पत्ता,दरमहा किती बिल येते, त्याचा संपूर्ण तपशील, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व सोबत त्यांच्या शिधापत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे व व्यक्तिशः अशा दोनही माध्यमाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

यानंतर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०५.१०.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरीही या माहितीचे स्वरुप हे अस्थायी असे आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारची माहिती मागविताना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद करणे अत्यावश्यक आहे. कारण अशास्वरुपाची माहिती ही कालपरत्वे बदलत असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेले दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र नव्हते तर त्यांनी त्यांच्या कुटुंबाच्या रेशन कार्डाची कोणीही साक्षांकित केली नसलेली अशी झेरॉक्स प्रत जोडली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे व व्यक्तिशः अशा दोनही माध्यमाद्वारे माहिती मागितली आहे आणि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०१.२०१० रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी कबूल केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याच्या कारणास्तव द्वितीय अपील केले आहे, तथापि आता अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुखदेव मराजी मोरे,रा.जलतरण तलाव रोड,प्लॉट १९/ए,गरमपाणी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५९

निर्णय दिनांक : ०५.०६.२०१०

१. श्री. राहुल रावसाहेब सरोदे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक परिवहन अधिकारी,
औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी टाळाटाळ होत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार कायदा २००५ अंमलात आल्यापासून ते दि. २४.०२.२००९ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये माहिती अधिकारात त्यांच्या कार्यालयाकडून विविध विषयाची माहिती मागविलेल्या व्यक्तींची नावे, पत्ता व दूरध्वनी क्रमांक, माहितीचा विषय, माहितीपोटी भरलेली रक्कम, माहिती घेतली अथवा नाही, याची नोंद - अशी माहिती छापील स्वरुपात व व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी संकलीत करुन अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ही माहिती घेऊन जातील, या अपेक्षेने तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी सोबत आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे आजच्या सुनावणीत मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. त्यामुळे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राहुल रावसाहेब सरोदे,रा.३१, रेणूकामाता मंदिरामागे, सातारा परिसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६०

निर्णय दिनांक : ०५.०६.२०१०

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता, : अपिलार्थी
रा.पिंपळगाव रेणुकाई, ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, स्थानिक स्तर,भोकरदन,
जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)विभाग,जालना
जि.जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग,भोकरदन, जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी वारंवार माहिती मागूनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळत नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे पिंपळगाव रेणुकाई येथे सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या गाव तलावाच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पिंपळगाव रेणुकाई येथील रोहयो अंतर्गत केलेल्या गावतलाव कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, मजुरांचे हजेरीपत्रक, मजूरांना दिलेले धान्य कुपन्स, इत्यादी बाबनिहाय माहिती - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २१,५००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती त्यांना दाखविण्याची त्यांच्या दि. २८.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे विनंती केली. तथापि यानंतरही

आवश्यक ती माहिती पाहण्यासाठी उपलब्ध न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांच्याकडे दि. २६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती दाखविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थी दि. १४.०५.२००९ रोजी ही माहिती पाहण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणीही आढळून न आल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मोजमाजपुस्तिकेच्या प्रती व अंदाजपत्रकाच्या प्रती या कामाशी संबंधित सहायक अभियंता श्रेणी २ व शाखा अभियंता, श्री. जी.एम.शेख व श्री. एच.आर.खान यांच्याकडे उपलब्ध आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी श्री. शेख व खान यांच्याशी पत्रव्यवहार करुनही संबंधितांनी हे अभिलेखे त्यांच्या कार्यालयास परत केले नाहीत. श्री. शेख व श्री. खान हे माहिती अधिकारी लघुपाटबंधारे विभागाच्या उपविभाग परभणी येथे सध्या कार्यरत आहेत. उर्वरित सर्व माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस कधीही दाखविण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम जास्त वाटल्यामुळे अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांना त्यांच्या दि. २८.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तपासणीसाठी त्यांना उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. तथापि अपिलार्थीच्या या विनंतीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही दाद दिली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दाखविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पाहण्याकरिता देखील संबधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी उपलब्ध करुन दिली नाही. अपिलार्थीपासून अशाप्रकारे त्यांना आवश्यक असलेली माहिती दडवून ठेवण्यामागे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांचा चांगला हेतू निश्चित नसावा. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती श्री. जी.एम.शेख व श्री. एच.आर.खान यांच्याकडे उपलब्ध आहे. ते सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग परभणी येथे कार्यरत आहेत. त्यांच्याशी जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार करुनही श्री. शेख व श्री. खान हे या माहितीशी संबंधित शासकीय अभिलेखे त्यांच्याकडे हस्तांतरित करीत नाहीत. सार्वजनिक बांधकाम संहितेनुसार शाखा अभियंत्याने त्याची बदली झाल्यानंतर त्याचा पदभार त्यांच्याकडील मोजमापपुस्तिका व अंदाजपत्रकाच्या प्रतीसोबत, त्यांच्या बदलीवर येणाऱ्या अधिकाऱ्याकडे सुपूर्द करणे भाग आहे. तथापि या प्रकरणी श्री. खान व शेख या दोन्ही अधिकाऱ्यांनी संबंधित अभिलेखे त्यांच्या नंतर येणाऱ्या अधिकाऱ्याकडे हस्तांतरित केले नाहीत. त्यामुळे एकतर सदर अभिलेखे गहाळ झाले असावेत किंवा ते श्री. खान व श्री. शेख यांच्याकडे परभणी येथे उपलब्ध असावेत. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती श्री. खान व श्री. शेख यांनी अपिलार्थीपासून दुष्ट हेतूने दडवून ठेवली असावी किंवा ती गहाळ केली असावी, त्यामुळे सध्याचे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे,

उपविभाग भोकरदन यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, श्री. खान व श्री. शेख यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्याच्या दृष्टीने प्रथमतः हस्तगत करुन घ्यावी अथवा शासकीय अभिलेखे गहाळ केल्याप्रकरणी त्यांच्यावर पोलीस ठाण्यात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा. ही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत करावी व अपिलार्थीस, श्री. शेख व श्री. खान यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतल्यास ती माहिती अथवा त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केल्यास एफ.आय.आर.ची प्रत व त्यांच्याकडे सध्या उपलब्ध असलेली माहिती एकत्रित करुन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२, श्री. जी. एम. शेख व त्यांचे सहायक श्री. एच.आर.खान, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकरी समजावे, अशी तरतुद आहे, या दोन्ही अधिकाऱ्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन न देऊन व ती अपिलार्थीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी दुष्ट हेतूने दडवून ठेवल्याचे सिध्द होत असल्यामुळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात

येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जी.एम.शेख व श्री.एच.आर.खान यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता,रा.पिंपळगाव रेणकाई, ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. श्री. जी.एम.शेख, सहायक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. श्री. एच.आर.खान, शाखा अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६१

निर्णय दिनांक : ०५.०६.२०१०

१. श्री. शेख म.शमशोद्दीन म.उस्मान : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री.मुनवर खान,
अध्यक्ष, मदिना एज्युकेशन सोसायटी,
परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. निलपत्रेवार दत्तात्रय लक्ष्मणराव, विस्तार अधिकारी (शिक्षण) उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. निलपत्रेवार दत्तात्रय लक्ष्मण, विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०४.०६.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २२.१२.२००९ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार नाही.

अपिलार्थीस त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे आणि याबाबत आता अपिलार्थीची कोणतीही तक्रार नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३६१/०९, दिनांक २९.०८.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०५.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख म.शमशोद्दीन म.उस्मान, रा.सरहद्द गांधी ऊर्दू प्राथमिक शाळेजवळ, मदिनानगर, परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६२

निर्णय दिनांक : ०५.०६.२०१०

१. श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
समाज कल्याण कार्यालय,
जिल्हा परिषद, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी गट-अ,
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे आणि त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनुदानित अपंग शाळेसंदर्भात एकूण तीन मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - परभणी जिल्हयातील अनुदानित अपंग विद्यालयाती मंजूर विद्यार्थ्यांची संख्येसह यादी, परभणी जिल्हयातील अपंग शाळांमध्ये सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या घराची पत्त्यासह यादी व या शाळांच्या सन २००७-०८ या कालावधीतील ऑडीटेड स्टेटमेंटच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०६.२००९ रोजी सुनावणी घेऊन सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस १२० पृष्ठांची माहिती देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि प्राप्त माहितीतील काही त्रुटी काढून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असल्याच्या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत दि. १४.०७.२००९ रोजी पत्र सादर केले. तथापि या त्रूटीची पूर्तता न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांच्याकडून

प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची माहिती देण्यात आली असून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीचा समावेश नाही. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भात त्यांना दिलेल्या माहितीमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या जन्मतारखेचा उल्लेख नाही आणि त्यांना त्यांच्या मुद्दा क्र. २ संदर्भात एकूण २५ शाळेची यादी देण्यात आली. परंतु मुद्दा क्र. ३ द्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात ऑडीटेड स्टेटमेंट मात्र  २१ शाळांचे देण्यात आले. तसेच  अशीच  माहिती त्यांच्या परिचयाच्या व्यक्तीने मागितली असता, त्या व्यक्तीस प्राप्त झालेली माहिती व अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती यामध्ये विसंगती असल्याचे त्यांना आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहाता असे आढळून येत आहे की,  या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तीश:' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशाप्रकारचे उत्तरदायित्त्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आज रोजी सुनावणीमध्ये

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधकारी यांनी दि. २४.०६.२००९ रोजी पुरविलेल्या १२० पृष्ठांच्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीचा यामध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. या मुद्यावर अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, अपंग शाळेची बनावट संख्या दाखवून या शाळांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानाचा गैरवापर होण्याची शक्यता असल्यामुळे त्यांनी या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजही हवी आहे. अपिलार्थीस त्यांना प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित विद्यार्थ्यांच्या जन्मतारखेचा उल्लेख नसल्यामुळे त्यांना या मुद्यावरील माहिती अपूर्ण प्राप्त झाली आहे, असे वाटते. या संदर्भात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी मूळ अर्जामध्ये या विद्यार्थ्यांच्या जन्मतारखेची मागणी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विचाराधीन प्रकरणातील त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात मूळात देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती अर्धवट मिळाली, हा त्यांचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीने असा आक्षेप घेतला आहे की, त्यांना एकूण २५ शाळांची माहिती प्राप्त झाली असताना ऑडीटेड स्टेटमेंट मात्र २१ शाळांचे प्राप्त झाले आहे. यासंदर्भात चार शाळांचे सन २००७-०८ या कालावधीचे लेखा परीक्षण, अपिलार्थीने माहिती मागतेवेळी झाले नसावे, असा निष्कर्ष त्यातून निघू शकतो. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी, परभणी जिल्हयातील उर्वरित अपंग शाळांचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील लेखा परीक्षण आता झाले असल्यास त्या लेखा परीक्षण अहवालाची प्रत अपिलार्थीस पुरवावी किंवा या शाळेच्या संदर्भात लेखा परिक्षणाची सद्यस्थिती अपिलार्थीस अवगत करावी.

वरील परिच्छेदात अपिलार्थीस देय असलेल्या व प्रत्यक्ष त्यांना प्राप्त झालेल्या माहितीचे केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित संपूर्ण माहिती व मुद्दा क्र. ३ मधील उर्वरित शाळांच्या संदर्भातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना,हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माणिकराव माधवराव मुलगीर,द्वारा - बी-५, पोलीस क्वॉर्टर, परभणी-४३१४०१.

२. जन माहिती अधिकारी, समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट -अ,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

## अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६३

निर्णय दिनांक : ०५.०६.२०१०

१. श्री. प्रकाश येसाजी खाडे, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
भारत विद्यालय हायस्कुल,नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे त्यांनी मागणी केलेल्या कार्यकारी मंडळाच्या नावांची यादी आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, भारत विद्यालय,नांदेड या शाळेसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. यातील मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'राष्ट्रीय शिक्षण समिती, नांदेड या संस्थेच्या सद्यपरिस्थितीतील कार्यकारी मंडळाची यादी ' अशी माहिती

मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३,१०४/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २७.०५.२००९ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०५.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.नांदेड यांच्याकडे दि. १६.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००९ रोजी सुनावणी घेऊन सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.०८.२००९ रोजी उर्वरित माहिती दिली. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे प्रथम अपील करताना त्यांच्या मूळ अर्जातील माहती व्यतिरिक्त अतिरिक्त माहिती मागितली होती, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.०८.२००९ रोजी दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना दि. ३०.०५.२००९ रोजी दिलेल्या माहितीबरोबरच दिली असून, ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती दि. ३०.०५.२००९ रोजी दिली गेल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीस दि. ३०.०५.२००९ रोजी माहिती प्राप्त होऊनही त्यांनी आयोगाकडे या मुद्यावरील माहितीकरिता द्वितीय अपील करण्याचे कारण आयोगाने अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थीने परत या मुद्यांवरील माहिती त्यांना मिळाली नसल्याच्या मुद्दयावर ठाम राहून, त्यांचा अप्राप्त माहितीचा हेका कायम ठेवून,जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेली पोचसही त्यांनी कशी केली, हे त्यांना आठवत नसल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहाता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासंदर्भातील त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव द्वितीय अपील करुन या मुद्यावरील माहितीची मागणी या द्वितीय अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सशुल्क पुरविली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने आणि अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेल्या युक्तिवादामध्ये कोणताही तथ्यांश आयोगास आढळून आला नसल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश येसाजी खाडे,वसंतराव नाईक कॉलेजसमोर, सिडको,नवीन नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,भारत विद्यालय हायस्कुल,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६४

निर्णय दिनांक ०५-०६-२०१०

१ श्री. ओव्हाळ दिपक रामा, : अपिलार्थी
रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, उपविभाग परंडा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांना परंडा व उस्मानाबाद येथील उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्राहक क्रमांक ६०३१७०००१९८९ डी. टी. सी. क्रमांक ४४२९१५६ हा डी. पी. किती व्होल्टेजचा आहे व या डीपीवरुन केलेल्या विद्युत जोडणीसंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याच्या कारणास्तव अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या सहा मुद्दयावरील माहितीपैकी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट न होऊ शकणा-या स्वरुपाची आहे. या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे आणि भविष्यकाळाची माहिती मागितल्याचे

आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची, निर्णयाबद्दलची अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणा-या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अथवा त्यांच्या कृतीबद्दलची कारणे, स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशा प्रक्रिया समाविष्ट नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. सबब अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभाग परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ओव्हाळ दिपक रामा, रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६५

निर्णय दिनांक ०५-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक दिगंबर तानवडे,<br>२७/४५६, रामनगर, सेंट्रल बिल्डींगसमोर, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना प्राप्त झालेल्या रजा रोखीकरण रकमेतून वजा केलेल्या रकमेच्या तपशीलासंदर्भात एकूण पाच मुद्दयांव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२ इतके त्यांना चलनाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १३-०८-२००९ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०८-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरच्या कालावधीत अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणत्याही मुद्दयावरील माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता, त्यांच्यावर विभागीय चौकशी न करता त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांना देय असणा-या रकमेमधून उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून ८,००० रुपये इतक्या रकमेची वसुली अन्यायकारकरित्या करण्यात आली. या प्रकरणाची तड लावण्याच्या दृष्टीने त्यांना ही माहिती आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याशी संबंधित होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९७४ ते ७६ मधील, अंदाजे ३६ वर्षापूर्वीच्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे. ही माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे ते आयोगास सांगत आहेत व याचबरोबर त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, ही माहिती लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याशी संबंधित आहे. तथापि बांधकाम व सिंचन विभागातील कर्मचा-यांच्या आस्थापनेचे व्यवस्थापन बांधकाम विभागाकडे असल्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) यांच्याकडे माहितीची मागणी करण्याची त्यांची कृती बरोबर असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर या कालावधीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्या कार्यालयातर्फे सदर माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपल्यामुळे नष्ट केली गेली असेल तर त्याचा पुरावा अपिलार्थीस द्यावा, अन्यथा ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर त्यांनी आवश्यकतेप्रमाणे योग्य ती कारवाई करावी व तसे अपिलार्थीस अवगत करावे.

प्रसंगावशात् या प्रकरणी अपिलार्थीच्या सेवानिवृत्तीनंतर देय असलेल्या लाभातून अपिलार्थीस कोणतीही कल्पना न देता अथवा अपिलार्थीकडून कोणताही खुलासा न मागविता कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांच्या देयकामधून ८,००० रुपये इतकी रक्कम वसूल केली आहे. या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अशा प्रकरणांकरिता महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण हे स्वतंत्र सक्षम प्राधिकरण उपलब्ध असल्याने, त्यांनी या प्रश्नाची तड लावण्यासाठी या प्राधिकरणाकडे आपला अर्ज करावा जेणेकरुन त्यांच्या मूळ गा-हाण्याची तड लागू शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक दिगंबर तानवडे, २७/४५६, रामनगर, सेंट्रल बिल्डींगसमोर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६६

निर्णय दिनांक ०५-०६-२०१०

१ श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपिलार्थी

मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी

माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. व्ही. पाटील यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०५-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १३६६/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा

उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६८

निर्णय दिनांक ०५-०६-२०१०

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी

रा. जानेपुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास

यंत्रणा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास

यंत्रणा, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १८-०५-२०१० रोजीचे पत्र जे आयोगास दिनांक २४-०५-२०१० रोजी प्राप्त झाले ते आयोगास सादर

करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १३६८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, रा. जानेपुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७४

निर्णय दिनांक : ०७.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैलास पांडुरंग पवार,<br>रा.औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>संचालक/मुख्याध्यापक,<br>राहुल प्राथमिक शाळा, औरंगाबाद | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, राहुल प्राथमिक शाळा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शंभुनगर, गादिया विहार, औरंगाबाद येथील शाळेच्या संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.११.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील

केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादावरुन व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ११.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे,या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. ११.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.११.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कैलास पांडुरंग पवार,शिवाजी नगर,सिडको क्र.डी ९८/१६, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,राहुल प्राथमिक शाळा,समतानगर,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७१

निर्णय दिनांक ०७-०६-२०१०

१ श्री. बलराम आशन्ना, : अपिलार्थी
रा. भडकल गेट, काजीवाडा, घर नं. २-१-७२,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून दिनांक २८-०४-२०१० रोजी लिहिलेले पत्र त्यांच्या दिनांक ०१-०६-२०१०

रोजीच्या पत्राद्वारे आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १३७१/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या पत्रामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने, त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३७१/२००९, दिनांक १८-०९-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बलराम आशन्ना, रा. भडकल गेट, काजीवाडा, घर नं. २-१-७२, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७८

निर्णय दिनांक ०७-०६-२०१०

१ श्री. धनेश्वर गुरुनाथ बिबराळे, : अपिलार्थी
रा. ब्राम्हणगल्ली, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी
कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, चाकूर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दुष्ट हेतूने नाकारली असल्याचे नमूद करुन, संबंधितांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेली सन १९९८ ते २००९ या कालावधीशी संबधित एकूण १४ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२,९०० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस वेळेत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित करणारे पत्र त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील केल्यानंतर प्राप्त झाले असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, तर जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचा दिनांक २५-०८-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत करावा. अपिलार्थीने त्यांचा सदरचा अपील अर्ज त्यांच्याकडे हस्तांतरीत केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील

अर्जावर, सदर अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनेश्वर गुरुनाथ बिबराळे, रा. ब्राम्हणगल्ली, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७९ व १४२३

दिनांक ०७-०६-२०१०

१ श्री. मच्छिंद्र गोरोबा कोळी, : अपिलार्थी
मु. पो. दत्तमंदिराजवळ, औराद शहाजानी, तालुका निलंगा,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पोलीस अधीक्षक,
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा पोलीस अधीक्षक,
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, औसा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक २२-०९-२००९ रोजी नोंदविलेले व राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २९-०९-२००९ रोजी प्राप्त झालेले व औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक २८-१०-२००९ रोजी नोंदविलेली व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांची छाननी केली असता, अपिलार्थीने एकच अपील राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास व औरंगाबाद खंडपीठास केल्याचे आढळून येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने व अपूर्ण आणि दिशाभूल करणारा पत्रव्यवहार करुन आणि जाणीवपूर्वक माहिती दडविल्यामुळे, चौकशी होऊन त्यांना न्याय देण्याची विनंती त्यांनी या अपील अर्जात आयोगास केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी त्यांच्या वकिलासह आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आवश्यक ती कागदपत्रे आयोगास वेळेत सादर न करु शकल्यामुळे या अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख व वेळ सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मच्छिंद्र गोरोबा कोळी, मु. पो. दत्तमंदिराजवळ, औराद शहाजानी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, औसा, जिल्हा लातूर.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३११

निर्णय दिनांक ०७-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवदास दामोधर शहाणे,<br>मु. पो. नूतन वसाहत, अंबड, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यालय उप अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>सर्वेक्षण उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. श्रीवास्तव, श्री. शिंदखेडकर, श्री. राजपूत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच श्री. संजय व्यंकटराव पडलवार, उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, जिल्हा जालना यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०५-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक २३११/२००८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु. पो. नूतन वसाहत, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०३

निर्णय दिनांक ०९-०६-२०१०

१ श्री. अंगद ज्ञानोबा चाटे, : अपिलार्थी
मु. पो. आंदबोरी (चि.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, आंदबोरी (चि.), तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आंदबोरी (चि.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २०-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, आंदबोरी (चि.), तालुका किनवट यांनी दिनांक २७-०९-२००९ रोजी उपलब्ध करुन दिली असल्याने या पत्रामध्ये अपिलार्थीने सदर प्रकरण निकाली काढून पंजिका बंद करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीच्या या पत्रावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्या-मुळे त्यांना विचाराधीन अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंगद ज्ञानोबा चाटे, मु. पो. आंदबोरी (चि.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आंदबोरी

(चि.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पं.), पंचायत समिती कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९१

निर्णय दिनांक : १०.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बबन महादू घोडेराव,<br>रा.चांदेकसारे (आनंदवाडी),<br>ता.कोपरगाव,जि.अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग,कोपरगाव,<br>जि.अहमदनगर | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
जिल्हा परिषद लघुपाटबंधारे
उपविभाग,कोपरगाव,
जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१२.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती दिली गेली नाही. त्यांना चुकीचे व उशिरा उत्तर मिळाल्याने आणि दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी सन १९६६ ते १९७२ या कालावधीमध्ये कोपरगाव-संगमनेर रोड, एस.बी.रोड व पुणतांबा-कोपरगाव रोड येथे ते मैलबिगारी म्हणून कार्यरत असताना त्या कालावधीतील त्यांना प्राप्त झालेल्या पगारपत्रकाच्या साक्षांकित प्रतीची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अहमदनगर, बांधकाम विभाग यांना उद्देशून केला होता. तथापि त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०४.२००९ रोजी उपअभियंता, जिल्हा परिषद ल.पा.उपविभाग कोपरगाव यांना उद्देशून प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग,अहमदनगर या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या दिनांक २८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अपील अर्ज उपअभियंता, जिल्हा परिषद ल.पा. उपविभाग कोपरगाव यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविला असल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अशाप्रकारे संबंधितांच्याकडून निर्णय न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रभारी उपअभियंता श्री. एस.एन.तंटक उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित उपअभियंता यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे त्यांना त्यांच्या कार्यालयात आढळून येत नाहीत. आयोगाने अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या जतन करुन ठेवण्याच्या

कालावधीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी तीस वर्षांचा असतो. सदर कागदपत्रे नष्ट केल्याचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे एखादा पुरावा आहे काय, असे आयोगाने विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यावर नकारार्थी उत्तर दिले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दि.२१.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे ही माहिती देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जास कार्यकारी अभियंता (बांधकाम),जि.प.अहमदनगर यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक)च्या तरतुदीनुसार पाच दिवसांच्या आत प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्ष ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या जन माहिती अधिकाऱ्याकडे न पाठविल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. वर निर्देशित केलेल्या कालावधीमध्ये जर त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे आढळून आली नाही तर, त्यांनी ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या

कर्मचाऱ्यावर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी अथवा प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील प्रकरणी, अपिलार्थीने कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असता, त्यांनी या अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६(३)(एक)च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही अथवा त्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यानंतर त्यांच्या कार्यालयातील उपकार्यकारी अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०४.२००९ रोजी केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात प्रतिसाद दिला आहे, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अशाप्रकारे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीचा भंग झाला आहे व परिणामी अपिलार्थी यांना त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागले आहे. सबब उपकार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,अहमदनगर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

३) सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) उत्तर विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १०.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बबन महादू घोडेराव,रा.चांदेकासारे (आनंदवाडी),ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद ल.पा.उपविभाग, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद ल.पा.उपविभाग, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (सार्वजनिक बांधकाम),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९२

निर्णय दिनांक : १०.०६.२०१०

१. श्री. सुभाष सुर्यभान गोरे, : अपिलार्थी
रा.राहुरी खूर्द, ता.राहुरी,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

त्रयस्थ पक्षः श्री. नंदकुमार सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांच्यावर कायद्यान्वये शिस्तभंगाची कारवाई होऊन, आदेश न पाळल्याबद्दल त्यांच्यावर दंडाची कारवाई व्हावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास सदरची बाब आणून दिली असतानादेखील दोषी आढळणाऱ्या वैशाली हिंगे यांच्यावर त्यांनी

कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांच्यावरही कारवाई व्हावी, अशी विनंती त्यांनी त्यांच्या अर्जाद्वारे आयोगास केली आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. नंदकुमार सुर्यवंशी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्याविरुध्द चालू असलेल्या खातेनिहाय चौकशी संदर्भात एकूण सात मुद्यांद्वारे वेगवेगळया प्रकारची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०२/- इतके त्यांना चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने सदरच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७.०१.२००९ रोजी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०१.२००९ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ७ च्या संदर्भात माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीमध्ये विसंगती आढळल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये त्यांना आजतागायत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस सात दिवसांचे आत माहिती पुरविण्याचे आदेश देऊनही अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्याकडील अभिलेखे पाहणी करुन नंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०१.२००९ रोजी दिलेली माहिती परत दि. ०२.०४.२००९ रोजी पुरविली. अशाप्रकारे अपिलार्थीस सत्य माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती शास्ती व दंडात्मक कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगास लेखी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २८.०१.२००९ रोजी त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर व दि. ०२.०४.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली, ही माहिती त्यांनी श्रीरामपूर उपविभागाकडून प्राप्त करुन घेऊन त्यांच्याकडून ज्या स्वरुपात प्राप्त झाली, त्याच स्वरुपात ती अपिलार्थीस दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीवर आक्षेप असल्याचे आयोगास कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. नंदकुमार सूर्यवंशी यांनी आयुक्तांच्या दि. ०२.०८.२००८ रोजीच्या आदेशानंतर दि. १८.१२.२००८ या कालावधीमध्ये किती प्रकरणे प्रकरणे निकाली काढली, अशी माहिती विचारली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी श्री. नंदकुमार सूर्यवंशी यांनी या कालावधीमध्ये पंधरा प्रकरणे निकाली काढली असल्याचे कळविले आहे तर अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, या

कालावधीमध्ये श्री. नंदकुमार सुर्यवंशी यांनी अकरा अपिले निकाली काढली असतानादेखील त्यांना श्री. सुर्यवंशी यांनी पंधरा अपिले निकाली काढली असल्याची विसंगत माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे संभवत नव्हते. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात आयोगास असा खुलासा केला की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी हे नियमितपणे किती अपिले निकाली काढतात, याबाबतची माहिती कोणत्याही प्रकारे त्यांच्याकडे संकलीत करुन ठेवली जात नाही. त्यामुळे ही माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे,कोणत्याही स्वरुपात उपलब्ध असण्याची शक्यता नव्हती. अशा वेळी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या दि. २२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्याकडे, सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत पाठवून, या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशी कार्यवाही न करता ही माहिती प्रथम उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर यांच्याकडून प्राप्त करुन घेतली व नंतर ती जशीच्या तशी अपिलार्थीस पुरविली. अपिलार्थीच्या मते जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती व प्रत्यक्षातील माहिती यामध्ये विसंगती आहे. याच मुद्यावर त्यांनी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या सहीने राहुरी व श्रीरामपूर तालुक्यात एकूण अकरा अपिले निकाली काढले असल्याची माहिती पुरविली आहे. ही माहिती अपिलीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दि. १८.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. अपिलार्थीस सदरची माहिती त्यांच्या कोणत्या अर्जाच्या संदर्भात प्राप्त झाली अशी आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थी हे या माहितीचा संदर्भ आयोगास दाखवू शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीतील कथित विसंगतीबाबत अपिलार्थीस असे सूचित करण्यात

येत आहे की, त्यांनी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत स्वतः उपस्थित राहून यासंदर्भातील अभिलेख्यांची व अपिलाच्या रजिस्टरची पाहणी करावी आणि त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढून यानंतर त्यांना आवश्यक वाटल्यास, या विसंगतीबाबत महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपविभागीय अधिकारी श्री. सुर्यवंशी यांच्याकडून त्यांना ज्या स्वरुपात माहिती प्राप्त झाली, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने माहिती दडविल्याचे अथवा जाणूनबुजून विसंगत माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची त्यांची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अर्धन्यायिक प्राधिकरण या नात्याने निर्णय दिला असल्याने आणि अधिनियमामध्ये अशाप्रकारच्या अर्धन्यायिक प्राधिकरणावर कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

अपिलार्थीस सत्य माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल),जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर यांच्या कार्यालयातील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ च्या संदर्भातील सर्व अभिलेखे तपासणीसाठी, अपिलार्थीस आवश्यक ते सहकार्य करण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्या कार्यालयास द्याव्यात. अपिलार्थीस

आवश्यक असलेले अभिलेखे तपासणीसाठी कोणतेही शुल्क त्यांना संबंधित महसूल विभागाच्या प्राधिकरणाकडे भरावे लागणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.६ च्या संदर्भातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत तपासणीसाठी व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : १०.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष सुर्यभान गोरे,रा.राहुरी खुर्द, ता.राहुरी,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९३

निर्णय दिनांक : १०.०६.२०१०

१. श्री. अंतोन शामसुंदर गायकवाड, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, रोहयो (कार्य) विभाग,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर

त्रयस्थ पक्षः उपविभागीय अभियंता, सार्वजनिक
बांधकाम उपविभाग, शेवगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी साहेबांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन हलगर्जीपणा केला आहे व त्यांच प्रथम अपील अर्ज फेटाळला आहे. शेवगाव येथील माहिती अधिकारी साहेबांनी माहितीच्या अधिकारावर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधीक्षक अभियंता कार्यालयाने त्यांना दि. २९.०७.२००९ रोजी दिलेल्या आश्वासनावर त्यांनी काय कार्यवाही केली, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांना उद्देशून केला असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्या कार्यालयाने त्यांच्याकडील दि. १४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या आश्वासनावर त्यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही कळविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील न करता, अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले त्यांचे विचाराधीन अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे. यासोबत सादर केलेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची तपासणी केली असता, सदरचे अपील त्यांनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शेवगाव यांच्याविरुध्द केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहे. सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर व कार्यकारी अभियंता, रो.ह.यो.(कार्य) विभाग,अहमदनगर त्रयस्थ पक्ष, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शेवगाव यांच्यासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सहायक अधीक्षक अभियंता,सा.बां.मंडळ,अहमदनगर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १४.०८.२००९ रोजी त्यांच्या दि. १२.०८.२००९

रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०७.२००९ रोजीच्या अधीक्षक अभियंता यांना उद्देशून दिलेल्या मूळ अर्जाद्वारे, त्यांनी माहिती अधिकारात केलेल्या त्यांच्या अन्य अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, शेवगाव येथील उप विभागीय अभियंता या माहिती अधिकाऱ्याने चुकीची व दिशाभूल करणारी दिल्याने त्यांची चौकशी करुन त्यांना निलंबित करावे, अशी विनंती केली होती आणि शेवगाव-पैठण रस्त्यावर श्री. मच्छिद्र रामभाऊ गुजर यांनी केलेले कथित अतिक्रमण काढण्याची त्यांनी विनंती केली. तथापि अपिलार्थीने संदर्भित केलेले अतिक्रमण हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या जमिनीवर केलेले नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस तसे कळविले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ,अहमदनगर यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करताना अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यपध्दती अवलंबिली नाही. त्यांनी या संदर्भात अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील करण्याऐवजी सरळ राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे, यापेक्षा महत्त्वाचे हे आहे की, अपिलार्थीच्या दि.१२.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जास दि. १४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये अपिलार्थीस ही माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १०.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंतोन शामसुंदर गायकवाड,रा.नागापूर बेथेल चर्चच्या पाठीमागे, ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९४

निर्णय दिनांक : १०.०६.२०१०

१. श्री. संजय रामहरी ठुबे, : अपिलार्थी
रा. सौंदाळा, ता.नेवासा, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
ग्राम पंचायत कार्यालय, सौंदाळा,
ता.नेवासा, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा,
जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय, सौंदाळा,
ता.नेवासा, जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : सौ. पुष्पा अर्जुन नवले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.१२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०२.१०.२००९ रोजी मूळ अर्जाद्वारे मु. सौंदाळा ता. नेवासा येथील नर्मदा स्टोन क्रशरच्या संदर्भात,सौ. पुष्पा अर्जुन नवले यांना रहिवाशी दाखला व नाहरकत दाखला कोणत्या ग्रामसभेत व किती सदस्यांच्या उपस्थितीत दिला गेला, रहिवाशी दाखला देताना त्यांनी कोणती कागदपत्रे दिली होती व स्टोन क्रशर चालू करण्यासाठी त्यांनी ग्राम पंचायतीकडे केलेल्या

अर्जाची प्रत, अशी माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती त्यांना त्यांच्याकडील अभिलेख्यामध्ये आढळून येत नसल्याचे कळविले. त्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मौ. सौंदाळा येथील नर्मदा स्टोन क्रशरसाठी दिलेला दाखला हा तेथील सरपंच यांनी ग्रामपातळीवर नियमानुसार प्रत्यक्ष चौकशी करुन दिला आहे, असे त्यांना कळविले आहे. परंतु यासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर अशाप्रकारची नोंद असलेली कागदपत्रे त्यांना अद्यापपावेतो मिळाली नाहीत. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भातील अहवाल गहाळ केला की काय किंवा जाळला की काय, अशा प्रकारची माहिती त्यांना संबंधितांकडून अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी शासकीय दप्तर दिरंगाई व शिस्तभंग केला असून अर्जदाराची फसवणूक केली असल्याचे त्यांचे अभिप्राय त्यांनी नोंदविले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष, सौ. पुष्पा अर्जुन नवले यांना रहिवाशी दाखला कोणत्या प्रमाणपत्राच्या आधारे दिला, सदर स्टोन क्रशर चालू करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे त्यांनी केलेल्या अर्जाची प्रत, सदर नाहरकत दाखला कोणत्या ग्रामसभेत व किती ग्रामपंचायत समिती सदस्यांच्या उपस्थितीत मंजूर झाला व त्यावेळी सादर केलेल्या टिपणीच्या प्रती आणि ज्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या सहीने हे दाखले दिले गेले आहेत, त्या सदस्यांची नावे, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या दप्तरी आढळून येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांना या अपील अर्जाच्या संदर्भात संबंधित जन

अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, नेवासा यांनी त्यांच्याकडील दि. १९.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, मौ. सौंदाळा येथील नर्मदा स्टोन क्रशरसाठी दिलेला नाहरकत दाखला व रहिवाशी दाखला हा सरपंच सौदाळा यांनी प्रत्यक्ष चौकशी करुन दिला असल्याचे व नियमानुसार ग्रामपातळीवर नाहरकत दाखला व रहिवाशी दाखला देण्याचा अधिकार सरपंच यांना असल्यामुळे संबंधित पदाधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे कळविले. जन अपिलीय यांच्या या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले त्यांचे विचाराधीन आयोगाकडे अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व गट विकास अधिकारी,पंचायत समिती,नेवासा उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी केलेल्या माहितीपैकी काही भाग, त्यांना त्यांच्या अन्य अर्जाद्वारे,महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडून माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झाला असून त्यांनी सौंदाळा ग्रामपंचायतच्या सरपंचांनी त्रयस्थ पक्षास दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची व रहिवाशी प्रमाणपत्राची प्रत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,सौंदाळा यांच्याकडे सादर केली आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, माहिती अधिकाऱ्याकडील कागदपत्रे बनावट असून नर्मदा स्टोन क्रशर यांनी सदरची परवानगी अनधिकृतरित्या प्राप्त करुन घेतली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊनही सापडली नाही. त्यांनी त्यांच्या दि. १३.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन परिस्थिती अपिलार्थीस कळविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणत्या

प्रकारे केला, यासंदर्भातील सबळ पुरावा आयोगाने त्यांच्याकडे मागितला असता, निश्चित अशा स्वरुपाचा कोणताही पुरावा सादर करण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अठरा वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळे ही माहिती शोधून घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना निश्चितपणे बराच कालावधी लागला आहे, यात शंका नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास ११ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात शोधून काढण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी फारसे प्रयत्न केले नसावेत असे आयोगास वाटत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात केलेल्या प्रयत्नाबाबतचा पुरावा - जसे त्यांच्या कार्यालयात सर्व संबंधितांना लिहिलेले पत्र वगैरे - अशाप्रकारचा पुरावा देखील जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकल्या नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, त्या अभिलेख्यांचा शोध घेऊन त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली व वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे देय माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी. या कालावधीनंतरही अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे आढळली नाही तर ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी अथवा प्रशासकीय स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी व तसे अपिलार्थीस त्यांच्या दि. ०२.१०.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात कळवावे. गट विकास अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर त्यांनी त्वरेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती
कृ.मा.प.५...
वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे अ ा
दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १०.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय रामहरी ठुबे,रा. सौंदाळा, पो.भेंडा,ता.नेवासा, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, सौदाळा,ता.नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९७

निर्णय दिनांक : १०.०६.२०१०

१. श्री. भाऊसाहेब नारायण उभेदळ, : अपिलार्थी
रा.कुकाणा, ता.नेवासा, जि. अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
दुय्यम अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय,
चिलेखनवाडी, ता.नेवासा, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय,
नेवासा, जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,नेवासा उपविभाग, जि.अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित (ग्रामीण विभाग), अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. भरत पी.वर्मा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.१२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये दुय्यम अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय,चिलेखनवाडी, ता.नेवासा, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नेवासा यांच्याकडे दि. ०७.११.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. यानंतर दि. ३१.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, सहायक अभियंता यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली, परंतु मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, कनिष्ठ अभियंता, सहायक अभियंता व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,ग्रामीण विभाग, अहमदनगर हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सर्व उपस्थितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकाराखाली त्यांच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज आणि त्यावरील अपील अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी हे सहायक अभियंता व जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता यांची नेमणूक झालेली आहे. दुय्यम अभियंता यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस सदोष वाटत आहे. त्यामुळे सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,नेवासा,जि.अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा दि. ०७.११.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे

हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत पाठवावा व सदर अपील अर्ज कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (ग्रामीण विभाग),अहमदनगर यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि.०७.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांच्याकडे प्राप्त झाल्यावर, या प्रकरणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०.०६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब नारायण उभेदळ,श्री.लक्ष्मी किराणा स्टोअर्स,रा.कुकाणा, ता.नेवासा, जि. अहमदनगर

२.	जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नेवासा उपविभाग, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (ग्रामीण विभाग), अहमदनगर कॉलेजच्या पाठीमागे, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५००

निर्णय दिनांक १०-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबासाहेब हरिश्चंद्र ढोकचौळे,<br>रा. रांजणखोल, पो. टिळकनगर, तालुका राहाता,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, राहाता,<br>तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. ०७.०७.२००९ रोजी प्राप्त झालेले, औरंगाबाद खंडपीठाच्या कार्यालयास दिनांक ०३.११.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०.०६.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी आवश्यक ती माहिती दि. ०७.०७.२००९ रोजी प्राप्त झाली असल्याने, त्यांना

आता विचाराधीन अपील चालविण्याचे कोणतेही प्रयोजन राहिलेले नाही. या अर्जाच्या अखेरीस त्यांनी सदरचे अपील निकाली काढावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

अशाप्रकारे खुद्द अपिलार्थीस त्यांचे विचाराधीन अपील चालविण्यामध्ये आता स्वारस्य उरले नसल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील त्यांच्या विनंतीप्रमाणे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबासाहेब हरिश्चंद्र ढोकचौळे, रा. रांजणखोल, पो. टिळकनगर, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५०१

निर्णय दिनांक १०-०६-२०१०

१ श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे, : अपिलार्थी
रा. प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड,
सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलीस निरीक्षक, बेगमपुरा पोलीस स्टेशन,
औरंगाबाद शहर.

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक पोलीस आयुक्त, छावणी विभाग,
औरंगाबाद शहर.

त्रयस्थ पक्ष : श्री. सैय्यद अजहर सैय्यद जफर
(पो. ह. बक्कल नं. १३०)

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत आयोगास, ते औरंगाबाद येथे महामहीम राष्ट्रपती, भारत सरकार यांच्या दि. १०.०६.२०१० रोजीच्या दौरा कार्यक्रमातील बंदोबस्तामध्ये व्यस्त असल्यामुळे विचाराधीन अपील सुनावणीची पुढील तारीख मिळण्यासाठी विनंती केली.

सदरची विनंती मान्य करण्यात येऊन विचाराधीन प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

सुनावणीची पुढील तारीख व वेळ सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**अहमदनगर**
**दिनांक १०-०६-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे, रा. प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, बेगमपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, छावणी विभाग, औरंगाबाद शहर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५०२

निर्णय दिनांक १०-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दादा गुलाब देशमुख,<br>लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग, कर्जत, जिल्हा अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कर्जत, जिल्हा अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. काझी (शाखा अभियंता)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०९.२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०.०६.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने आणि खुद्द अपिलार्थीने विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक १०-०६-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादा गुलाब देशमुख, लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५०५

निर्णय दिनांक ११-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनंतराव दगडू गारदे,<br>प्लॉट नं. ६, समतानगर, राजमाता कॉलनी, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>विभाग, नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-१२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २३-०९-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक २९-१०-२००९ रोजी प्रथम अपील केले. माहिती अधिका-याने त्यांना त्यांच्या दिनांक २३-१०-२००९ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे शुल्क रुपये

९१८४ इतके भरण्याचे सूचित केले. तथापि त्यांनी हे पत्र पोस्टाने दिनांक १७-११-२००९ रोजी टाकले तसेच त्यांच्या अपील अर्जावर दिनांक ३०-११-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना दिनांक ०७-१२-२००९ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे कळविले होते. तथापि हे पत्र त्यांनी दिनांक ०४-१२-२००९ रोजी पोस्टाने टाकले, हे पत्र त्यांना दिनांक १०-१२-२००९ रोजी प्राप्त झाले. त्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१२-२००९ रोजी दिलेला निर्णय त्यांना मान्य नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०९-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००९ रोजी प्राप्त झाला, त्या अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक ०१-०४-२००६ ते दिनांक ३१-०३-२००९ या कालावधीमध्ये रेट लिस्टवर झालेल्या कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रेट लिस्टच्या झेरॉक्स प्रती, कार्यारंभ आदेशाच्या झेरॉक्स प्रती, मोजमाप पुस्तिकांच्या आणि सदर कामाबाबत संबंधित खात्याच्या मागणीपत्राच्या झेरॉक्स प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-१०-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९,१८४ इतके त्यांना रोख स्वरुपात किंवा शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिला आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-११-२००९ रोजी पोस्टात टाकल्याचा पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केला आहे. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीची तारीख विलंबाने कळविल्यामुळे हे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही आणि अपिलार्थीच्या गैरहजेरीत त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाली. सुनावणीमध्ये अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या युक्तिवादावरुन त्यांना या विषयासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी त्यांना प्राप्त झालेली नाही, असे आयोगास आढळून येत आहे.

घटनाक्रमाच्या या टप्प्यावर अपिलार्थीच्या दिनांक २९-१०-२००९ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देऊन परत सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१.	अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. अनंतराव दगडू गारदे, प्लॉट नं. ६, समतानगर, राजमाता कॉलनी, सावेडी, अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५१३

निर्णय दिनांक ११-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पानगव्हाणे अविनाश प्रभाकर,<br>रा. माहेगाव देशमुख, तालुका कोपरगांव,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी : उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांना लेखी खुलासा करुनही मुदतीत कोणताही आदेश मंजूर न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, ‘ राजमुद्रा गैरवापर व सहकार्य करणारांवर कारवाई करण्याबाबतचा अर्ज ’ या विषयावर एकूण दोन मुद्दयांवर नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०५-२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २२-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क व टपालखर्च रुपये २५ इतके भरण्याचे सूचित केले. तथापि सदर पत्र प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि सदरचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ न शकल्यामुळे आणि प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

या प्रकरणी मूळात जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाला नसल्यामुळे त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रथमतः रजिस्टर्ड टपालाव्दारे पाठवून द्यावी किंवा व्यक्तिशः हस्तांतरीत करावी आणि अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीच्या दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी तीस दिवसांच्या आत

झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (गृह), मुंबई यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी-च्या दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अर्ज त्यांना प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पानगव्हाणे अविनाश प्रभाकर, रा. माहेगाव देशमुख, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०६
निर्णय दिनांक १४/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश सुदामराव गायकवाड,<br>रा.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, मुरुम, ता.उमरगा,<br>जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, मुरुम, ता.उमरगा,<br>जि.उस्मानाबाद | | |

<u>निर्णय</u>

श्री. सुरेश सुदामराव गायकवाड यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि.१५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३१.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०२.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १४/०६/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, यशवंत नगर, मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०७
निर्णय दिनांक १४/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-३२ | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | | |

निर्णय

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २९.०२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०४.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९५
निर्णय दिनांक १५/०६/२०१०

१ श्री. अंकुश बापूराव आंबेकर, : अपिलार्थी
रा.कोळपा, पो.कासारखेडा, ता.जि.लातूर
विरुध्द
१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर

निर्णय

श्री. अंकुश बापूराव आंबेकर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.११.२००९ रोजी केलेले दि. ०२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०२.०५.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०५.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. १५.०६.२००९ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या

दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ७७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. अंकुश बापूराव आंबेकर, रा.कोळपा, पो.कासारखेडा, ता.जि.लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९६
निर्णय दिनांक १५/०६/२०१०

१ श्री. लक्ष्मण सोपान घोगरे, : अपिलार्थी
रा.उपळे (मा.), ता.जि.उस्मानाबाद.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

निर्णय

श्री. लक्ष्मण सोपान घोगरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २४.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०३.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि.०६.११.२००८ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही हवी असलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १७९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. लक्ष्मण सोपान घोगरे, रा.मु.पो.उपळे (मा), ता.जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९७
निर्णय दिनांक १५/०६/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. साहेबराव सखाराम राठोड,<br>रा.धावरी (खु.), पो.थेरबन, ता.भोकर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, भोकर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, भोकर, जि.नांदेड | | |

निर्णय

श्री. साहेबराव सखाराम राठोड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०९.२००९ रोजी केलेले दि. १४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३०.०५.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५/०६/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. साहेबराव सखाराम राठोड, रा.धावरी (खु), पो.थेरबन, ता.भोकर, जि.नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९८
निर्णय दिनांक १५/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वीर आसाराम नरहरराव,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>न्यू हायस्कूल, सिरसाळा, ता.परळी वैजनाथ,<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>मराठावाडा शिक्षण प्रसारक मंडळ, देवगिरी<br>महाविद्यालय, औरंगाबाद | | |

निर्णय

श्री. वीर आसाराम नरहरराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. ३१.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २५.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०५.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. वीर असाराम नरहरराव, महाराष्ट्र हाऊसिंग कॉलनी, घर नं.८३, स्वस्त धान्य दुकान नं.३० च्या दक्षिणेस, धानोरा रोड, बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९९
निर्णय दिनांक १५/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिलिंद वसंतराव विटेकर,<br>रा.सोनपेठ, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | | |

निर्णय

श्री. मिलिंद वसंतराव विटेकर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०३.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २४.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, (पत्रकार, दै.लोकसत्ता), दत्त कृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, ता.सोनपेठ, जि.परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२६

निर्णय दिनांक १५-०६-२०१०

१ श्री. बळवंत किशनराव मोरे, : अपिलार्थी

द्वारा- तिरुमला एस. टी. डी., विष्णूनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

नगर परिषद कार्यालय, देगलूर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्याधिकारी, नगर परिषद, देगलूर, जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लेखापाल, नगर परिषद, देगलूर, जि. नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. हरीमोहन गंगाराम धनवे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले आयोगास दिनांक १५-०६-२०१० रोजी फक्सद्वारे प्राप्त झालेले एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आजच्या विचाराधीन

अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना देगलूर नगर परिषदेकडून प्राप्त झाली असल्याने, आता त्यांची या संदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नाही व आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील क्रमांक १४२६/२००९ हे, ते स्वखुषीने परत घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता परत घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बळवंत किशनराव मोरे, द्वारा- तिरुमला एस. टी. डी., विष्णूनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२२
निर्णय दिनांक १६/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर शंकरराव घुगे,<br>रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>जिंतूर, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जि.परभणी | | |

निर्णय

श्री. दामोधर शंकरराव घुगे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. ११.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १८.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०१.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६/०६/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु.पो.पांगरी, ता.जिंतुर, जि.परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२३
निर्णय दिनांक १६/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर शंकरराव घुगे,<br>रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिजगुणन केंद्र,<br>जिंतूर, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर,<br>जि.परभणी | | |

निर्णय

श्री. दामोधर शंकरराव घुगे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. ११.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ११.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०४.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) **अपील फेटाळण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु.पो.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२४
निर्णय दिनांक   १६/०६/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रितमसिंग तुलजासिंग पवार,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>हिमायतनगर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,<br>जि.नांदेड | | |

निर्णय

श्री. प्रितमसिंग तुलजासिंग पवार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. १०.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १०.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३१४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. प्रितमसिंग तुलजासिंग पवार, उप-संपादक, साप्ताहिक भ्रष्टाचार निर्मुलन, डॉ.आंबेडकर नगर, महावीर नगर पोलिस चौकी समोर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२५
निर्णय दिनांक १६/०६/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार, रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, जि.नांदेड | | |

निर्णय

श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०८.२००९ रोजी केलेले दि. १३.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०५.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार, संपादक, महाराष्ट्र दर्पण, राघवेंद्र अपार्टमेंट, दयानंदनगर, व्हीआयपी रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२६
निर्णय दिनांक १६/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. साबेर हुसैन शेख,<br>रा.जाफ्राबाद, जि.जालना | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>जि.जालना | | |

निर्णय

श्री. साबेर हुसैन शेख यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. ११.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २९.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**१) अपील फेटाळण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. साबेर हुसैन शेख (पत्रकार), हुसैन मंजिल, भोकरदन रोड, जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३६
निर्णय दिनांक १६-०६-२०१०

१ श्री. ए. डी. पाटील, : अपिलार्थी
रा.डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, ता. कन्नड,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक (पंचायत विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १६-०६-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते आजचे विचाराधीन अपील स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडील द्वितीय अपील आता या पत्राद्वारे मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील  खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. डी. पाटील, रा.डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक (पंचायत विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३८

निर्णय दिनांक १६-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हेमराज बालचंद भुरेवाल,<br>रा. जवाहर बाग, दे. राजा रोड, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित केल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १६-०६-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याने अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००९ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले आज रोजीचे विचाराधीन अपील मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हेमराज बालचंद भुरेवाल, रा. जवाहर बाग, देऊळगाव राजा रोड, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४३

निर्णय दिनांक १६-०६-२०१०

१ श्री. दिनेश सुगनचंद सुराणा, : अपिलार्थी
काद्राबाद, भाजीमंडी,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपसंचालक, शिक्षण विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक (शिक्षण), औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : नवयुवक गणेश विद्यालय (प्रा.), जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षण उपसंचालक यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यावर शिक्षण उप संचालकाने कोणतेही आदेश न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नवयुवक गणेश विद्यालय (प्रा.), जालना या शाळेविषयी काही माहिती व्यक्तिशः मागितली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनेश सुगनचंद सुराणा, काद्राबाद, भाजीमंडी, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, शिक्षण विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४

निर्णय दिनांक १६-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चंद्रकांत बी. के.<br>रा. साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्रत्यक्षात दाखविण्यात आली असून, माहिती पाहिल्यानंतर त्यांचे समाधान झाले असल्याचे त्यांचे पत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे लिहून दिले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या दिनांक ११-०६-२०१० च्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दाखविली आहे. यासंदर्भात त्यांची आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही आणि त्यांना छायांकीत प्रतीची आवश्यकता नाही. तरी त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे, अशी त्यांनी आयोगास या पत्राच्या अखेरीस विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या पत्रावरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती तपासणीसाठी प्राप्त झाल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि अपिलार्थीस दाखविलेली माहिती (मजुराच्या हजेरीपत्रकाच्या प्रती वगळता) आयोगास दाखविली. त्यामुळे आता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन उरत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत बी. के. रा. साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२७
निर्णय दिनांक १७/०६/२०१०

१ श्रीमती शैनाज बेगम मौ.युसूफ खान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका, तलत उर्दू प्राथमिक शाळा,
कबाडीपुरा, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

निर्णय

श्रीमती शैनाज बेगम मौ.युसूफ खान यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ११.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. शैनाज बेगम मौ.युसूफ खान, घर नं.५-२-३७, उस्मानपुरा, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२८
निर्णय दिनांक १७/०६/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अजित किसनलालजी कोठारी, रा.जालना | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बांधकाम विभाग, नगर परिषद, जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | | |

<u>निर्णय</u>

श्री. अजित किसनलालजी कोठारी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि.२१.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०४.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. २६.११.२००८ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १७५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं.२.२०.१५, पारसीगल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद, जालना.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२९
निर्णय दिनांक १७/०६/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सागरवाडी,<br>पो.सोमठाणा, ता.बदनापूर, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>बदनापूर, जि.जालना | | |

निर्णय

श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि.१७.०८.२००९ रोजी केलेले दि.२०.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०६.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट, जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७३०
निर्णय दिनांक १७/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिंदे नंदकुमार संदीपान,<br>रा.वंजारवाडी, ता.भूम, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, भूम, जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद | | |

निर्णय

श्री. शिंदे नंदकुमार संदीपान यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि.०६.०७.२००९ रोजी केलेले दि.१३.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०२.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०२.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. १८.०३.२००९ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. शिंदे नंदकुमार संदीपान, रा.वंजारवाडी, ता.भूम, जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७३१
निर्णय दिनांक १७/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. आतार खाजामैनोदीन हाजीमिया,<br>रा.हणेगांव, ता.देगलूर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक<br>कार्यालय, लातूर | | |

निर्णय

श्री. आतार खाजामैनोदीन हाजीमिया यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि.२१.०६.२००९ रोजी केलेले दि.०३.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०१.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १९.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०७.०१.२००९ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ८६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १७/०६/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. आतार खाजामैनोदीन हाजीमिया, मु.पो.हणेगांव, ता.देगलूर, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५३

निर्णय दिनांक १७-०६-२०१०

१ श्री. चंद्रशेखर प्रल्हादराव मोहरीर, : अपिलार्थी

भाग्यनगर, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, जालना-१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ नि. श्रे., जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,जालना जिल्हयातील स.नं.१९५/२ व १९५/३ मध्ये प्लॉट नं. ११४/बी च्या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये पहिल्या तीन मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील काही पत्रांच्या प्रती व चौथ्या मुद्याद्वारे स.नं.१९५/२ व १९५/३ मध्ये प्लॉट नं.११४/बी प्लॉट अधिकृत आहे किंवा नाही, अनधिकृत असल्यास कोणत्या जबाबदार अधिकाऱ्यांनी अधिकृत मान्यता दिली आहे,त्याची प्रत, या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती देऊ केली व मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्लॉटच्या एन.ए.ऑर्डरची प्रत लावलेली नसल्याचे व ती संबंधित पक्षकाराकडून उपलब्ध करुन घेऊन नंतर देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) जालना यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०१.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, परंतु त्यांच्याकडील दि. ३०.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यावर अपिलार्थीचे काय मत आहे, याचा खुलासा आठ दिवसांच्या आत सादर करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व विशेषत:,या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०१.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) जालना यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०१.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), जालना यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०६-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रशेखर प्रल्हादराव मोहरीर, मु. भाग्यनगर, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, जालना-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि. श्रे.), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५८

निर्णय दिनांक १७-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,<br>जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी ऑ. नं.<br>२७, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, अबंड, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १४५८/०९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी ऑ. नं. २७, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६०

निर्णय दिनांक १८-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नागोडे भानुदास कौतिकराव,<br>रा. घृष्णेश्वर कॉलनी, प्लॉट नं. २२, चाळीसगाव रोड,<br>कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड, जि. औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. महेश गोवडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही आदेश पारित केला नाही व माहितीही दिली नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०१-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ या मंडळाच्या संबंधित शाळेच्या संदर्भात व संस्थेसंदर्भात एकूण ९ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित संस्थेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश पारित न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आणि जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ३०-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नागोडे भानुदास कौतिकराव, रा. घृष्णेश्वर कॉलनी, प्लॉट नं. २२, चाळीसगाव रोड, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६४

निर्णय दिनांक १८-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भास्कर गोविंदराव पासेबंद, रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा संचालक, नगररचना कार्यालय, पुणे | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा संचालक, नगररचना कार्यालय, पुणे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | प्रशासन अधिकारी, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपसंचालक, नगररचना,मुख्य कार्यालय, पुणे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या पदोन्नतीसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत, अशी माहिती स्पीड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४१/- इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने शुल्काची रक्कम भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०९.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, मुख्य कार्यालय,पुणे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. तसेच त्यांनी सदर सुनावणीची पूर्वसूचना (नोटीस) अपिलार्थीस सुनावणीच्या प्रस्तावित दिनांकापूर्वी किमान एक आठवडा अगोदर अगोदर प्राप्त होईल, असे पहावे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय,पुणे यांनी अपिलार्थीच्या दि.२२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०६-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर गोविंदराव पासेबंद, १२१, श्रेयनगर, उस्मानपूरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगररचना व मूल्य निर्धारण विभाग, मुख्य कार्यालय,मध्यवर्ती कार्यालये, पुणे -४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, मुख्य कार्यालय,पुणे, मध्यवर्ती कार्यालये, पुणे -४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६६

निर्णय दिनांक १८-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रविण अशोक गायकवाड, रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग), औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १४.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः कधी संपर्क साधला होता, अशी आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने त्यांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १५.०९.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी दि. १५.०९.२००९ रोजी व्यक्तिशः संपर्क साधला असल्याचे सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. १४.०७.२००९ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झालेला नाही, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या दि. १५.०९.२००९ रोजीच्या अर्जावर त्यांच्या कार्यालयात दि. २८.१०.२००९,

१२.११.२००९ व १५.१२.२००९ रोजी सुनावणी ठेवली असता, सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले. यावर अपिलार्थीने त्यांना सदर सुनावणीची पत्रे प्राप्त झाली नसल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा दि. १४.०७.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झालेला नव्हता आणि या संदर्भातील अपिलार्थीच्या दि. १५.०९.२००९ रोजीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी त्या सुनावणीस गैरहजर राहिले. माहिती अधिकार अधिनियमातील संहितेनुसार जन माहिती अधिकाऱ्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यास किंवा अन्य कारणामुळे अपिलार्थीचे समाधान न झाल्यास त्यांना अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील करण्याची तरतुद आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा कथित प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविल्यासंदर्भात पोस्टाची पावती आयोगास सादर केली आहे. परंतु सदरचे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. आयोगाच्या कार्यालयातून या प्रकरणी आज रोजीच्या नोटीसबरोबर अपिलार्थीच्या दि. १४.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांना पाठविली आहे व ती जन अपिलीय अधिकारी यांना आता प्राप्त झालेली आहे. हे पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १४.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. तसेच त्यांनी सदर सुनावणीची पूर्वसूचना (नोटीस) अपिलार्थीस सुनावणीच्या प्रस्तावित दिनांकापूर्वी किमान एक आठवडा अगोदर प्राप्त होईल, असे पहावे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१४.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १८.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रविण अशोक गायकवाड, द्वारा एस.एम.पालवे, एन-१२, एफ-७३/४,स्वामी विवेकानंद नगर,हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१४

निर्णय दिनांक १८-०६-२०१०

१ श्री. प्रताप किसनराव गायकवाड, : अपिलार्थी
कार्यालय - आर. पी. रोड, नगर परिषद शाळेमागे,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. दोडके (शाखा अभियंता)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही माहिती न दिल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १४-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक २३१४/०८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रताप किसनराव गायकवाड, कार्यालय - आर. पी. रोड, नगर परिषद शाळेमागे, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,

जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७२

निर्णय दिनांक १९-०६-२०१०

१ श्री. सतीश अंकुशराव देशमुख, : अपिलार्थी

रा. इन्कम टॅक्स कॉलनी, जुना जालना, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १,

जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १,

जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ३, जालना

त्रयस्थ पक्ष : १) श्री. संतोष लोढे, २) श्री. पाखोला, ३) श्री. राजपूत ४) श्री. यलांडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष (श्री. राजपूत वगळता), जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जाची तपासणी करताना आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जावर त्यांनी स्वाक्षरी केलेली नाही. विचाराधीन अपील अर्जावर अपिलार्थीने मूळात स्वाक्षरी केली नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील अवैध असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सतीश अंकुशराव देशमुख, रा. इन्कम टॅक्स कॉलनी, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ३, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७८

निर्णय दिनांक १९-०६-२०१०

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, : अपिलार्थी
व्दारा- श्री. मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००१ ते दिनांक १८-०२-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-

नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २९-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणतेही आदेश पारीत केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब, जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद, लातूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, व्दारा- श्री. मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७९

निर्णय दिनांक १९-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई,<br>रा. १/५७६, शास्त्रीनगर, सेलू, तालुका सेलू,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू,<br>जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू,<br>तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : सेलू सी. टी. नेटवर्क (श्री. महेश सांगताणी)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेलू सी. टी. नेटवर्क (सांगताणी) या त्रयस्थ पक्षाच्या केबल जोडणीसंदर्भात सन २००४ ते ऑगस्ट २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, त्रयस्थ पक्ष श्री. महेश सांगताणी, सेलू सिटी नेटवर्क यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे मागितली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, सेलू यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १०-११-२००८ रोजी पत्र देऊन, अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष श्री. महेश सांगताणी यांच्या सेलू सिटी नेटवर्क या कंपनीविषयी काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीप्रमाणे निर्णय न देता त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देणे बाकी असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, जिल्हा परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाचे म्हणणे लक्षात घेऊन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, जिल्हा परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक	१९-०६-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई, रा. १/५७६, शास्त्रीनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२	जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९१४

निर्णय दिनांक १९-०६-२०१०

१ श्री. अंकुश एम. पवार, : अपिलार्थी

प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कार्यालय

औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०५-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केल्या गेलेल्या एकूण ९ कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या गावामध्ये गटनिहाय झालेल्या कामावरील सर्व

मजुरांच्या रोजगार पत्रिकेच्या प्रती, जॉब कार्ड, त्यांच्या ओळखपत्राचा क्रमांक, पोस्ट, बँक खाते क्रमांक, ठिकाण, हजेरीपट आणि मोजमाप पुस्तिकाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १७-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ५४ कामांची माहिती मागितली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कार्यालय औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८५

निर्णय दिनांक २१.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भुजंग पुंडलिकराव गायकवाड,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधिकारी,<br>सामान्य रुग्णालय, परभणी. | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>सामान्य रुग्णालय, परभणी | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
सामान्य रुग्णालय,परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. बालाजी व्यंकटराव शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. बालाजी व्यंकटराव शिंदे यांच्या शारीरिक अपंगत्वाच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, ही माहिती मागितली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २४.०५.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असल्यामुळे व या प्रकरणी त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्यामुळे ते विचाराधीन अपील परत घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दिलेल्या या पत्राद्वारे त्यांनी विचाराधीन अपील मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २१.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भुजंग पुंडलिकराव गायकवाड,मु.इडग्याळ (प.मु.) पो.मुक्रमाबाद, ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,सामान्य रुग्णालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यां-ना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९०

निर्णय दिनांक २१-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामचंद्र मारुती कांबळे,<br>रा. वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी, उपविभाग, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये अपीलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी

अर्धवट व चुकीची माहिती देऊन, माहिती दडविली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे कोरेवाडी, तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद येथील वस्तीवाडीसाठी भूसंपादन केलेल्या जमिनीबाबत ८ मुद्दयांव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १७-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरच्या कालावधीतही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दिनांक २७-११-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, केवळ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्यामुळे, जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचा निष्कर्ष काढून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे या प्रकरणातील प्रथम अपील मान्य केले आणि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना अपेक्षित पुरविलेली माहिती याबाबत कोणतेही अभिप्राय त्यांच्या या निर्णयात व्यक्त केलेले नाहीत. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात मुद्देनिहाय सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, रा. वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१५

निर्णय दिनांक २१-०६-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अभयकुमार बलिराम यादव,<br>रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>कार्यालय, जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०१-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक २३१५/०८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभयकुमार बलिराम यादव, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०६

निर्णय दिनांक २२-०६-२०१०

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, : अपिलार्थी

मु. पो. नुतन वसाहत, अंबड, ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), अंबड, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपविभागीय अधिकारी, वनविभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. भोईटे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०-०६-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये

अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १४०६/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १४०६/२००९, दिनांक १०-०६-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु. पो. नुतन वसाहत, अंबड, ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ १३२०
निर्णय दिनांक २३-०६-२०१०

१ श्री. शेख मुजीब शेख खुदाबक्ष, : अपिलार्थी
रा. शरीफ कॉलनी, रोशनगेट, परवाना हॉटेलच्या
पाठीमागे, गल्ली नं. १, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, नुर उर्दू प्राथकि शाळा, उस्मानपुरा, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ११-०५-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त

झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १३२०/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३२०/२००९, दिनांक २४-०८-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख मुजीब शेख खुदाबक्ष, रा. शरीफ कॉलनी, रोशनगेट, परवाना हॉटेलच्या पाठीमागे, गल्ली नं. १, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३२३
निर्णय दिनांक २३.०६.२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बस्वराज भिमराव कपाळे,<br>रा. उदगीर, जि. लातूर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,<br>विभाग उदगीर, जि.लातूर | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा,<br>कार्यकारी अभियंता,<br>म.रा.वि.वि.मर्या.मंडळ,उदगीर, जि.लातूर | |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर उपविभाग, उदगीर जि.लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, उदगीर,जि.लातूर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी असून त्यांना मुदतीच्या आत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जाची सुनावणी आज दिनांक २३.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि. ०९.०६.२०१० रोजीचे निवेदन आयोगास सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने, त्यांची आता विचाराधीन अपिलासंदर्भात कोणतीही तक्रार नाही. या अर्जाच्या अखेरीस त्यांनी सदरचे अपील रद्द करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

अशाप्रकारे खुद्द अपिलार्थीस त्यांचे विचाराधीन अपील चालविण्यामध्ये आता स्वारस्य उरले नसल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील त्यांच्या विनंतीप्रमाणे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २३.०६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बस्वराज भिमराव कपाळे,रा.कपाळे गल्ली, उदगीर, जि. लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,शहर उपविभाग, उदगीर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मंडळ मर्यादित,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१२

निर्णय दिनांक २८.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती कल्पना एम. सुलगुडले (भुरे),<br>पार्वती निवास, बसवेश्वर कॉलनी, ब्लॉक नं. २३,<br>लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, तलाठी कार्यालय, सजा बोरी, तालुका जिल्हा<br>लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, मंडळ विभाग, कासारखेडा, तालुका<br>जिल्हा लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २५.०५.२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिति त्यांना मंडळ अधिकाऱ्याने त्यांचे स्तरावर दि. २०.०५.२०१० रोजी दिली असल्याचे नमूद केले आहे व सोबत अपिलार्थीची ही माहिति प्राप्त झाल्याबद्दलची पोचसही असलेल्या मंडळ अधिकाऱ्याच्या दि. ०६.०५.२०१० रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस मंडळ अधिकाऱ्याने त्यांचे स्तरावर आवश्यक असलेली माहिति पुरविली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी आयोगासमोर संबंधितांपैकी कोणीही उपस्थित नाही, हे पाहता, अपिलार्थीचे मंडळ अधिकाऱ्याने पुरविलेल्या माहितीवर समाधान झाले असावे, अशा निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २८.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती कल्पना एम. सुलगुडले (भुरे), पार्वती निवास, बसवेश्वर कॉलनी, ब्लॉक नं. २३, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा बोरी, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ विभाग, कासारखेडा, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१३

निर्णय दिनांक २८.०६.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवदास दामोधर शहाणे,<br>मु. पो. नूतन वसाहत, अंबड,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग,<br>अंबड, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता,
जिल्हा परिषद (बां.),उपविभाग अंबड,जि.जालना

जन अपिलीय अधिकारी : उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. पठाण

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा त्रयस्थ पक्ष व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २४.०५.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती मिळाल्याची अपिलार्थीने कबूली दिली असून प्राप्त माहितीवर त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे.

अशाप्रकारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २८-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु. पो. नूतन वसाहत, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बां.) उपविभाग अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१०
निर्णय दिनांक ३०/०६/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद | | |

<u>निर्णय</u>

श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. २८.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २४.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १७.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०८.०४.२००९ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या

दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे, घर नं.४-१७-१८, मिलकॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद ४३१००१.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२११
निर्णय दिनांक ३०/०६/२०१०

१ सौ.एस.पी.नैण, : अपिलार्थी
रा.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण किनवट, परिक्षेत्र किनवट,
ता.किनवट, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

निर्णय

सौ.एस.पी.नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केलेले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०६/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) सौ.एस.पी.नैण, व्दारा-मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३१

निर्णय दिनांक ३०-०६-२०१०

१ सौ. कोमल एस. विटेकर, : अपिलार्थी

प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळूज महानगर,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, कार्यालय बदनापूर,

तालुका बदनापूर, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कार्यालय जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०५-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०६-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणी या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी सौ. कोमल एस. विटेकर यांचे नुकतेच निधन झाल्याचे वर्तमानपत्रात आयोगाच्या वाचण्यात आले आहे. सुनावणीसाठी आज जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही. मूळात अपिलार्थीचे

आता निधन झाले असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील हे तथ्यहीन होत असल्याने सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०६-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कार्यालय बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कार्यालय जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५८

निर्णय दिनांक : ३०.०६.२०१०

१. श्री. कुडदे प्रकाश विठ्ठलराव, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र समिति, नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,नाशिक
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र
तपासणी समिती,नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आयोगाकडे अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. ३०.०६.२०१० रोजीचे एक निवेदन आयोगास समक्ष सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना मिळाली

आहे आणि प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेले नाही. त्याचप्रमाणे आयोगाकडे दाखल केलेले अपील क्र. १०५८/०९ स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन विचाराधीन अपील रद्द करण्याची त्यांनी या निवेदनाच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीची सदरची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.०६.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कुडदे प्रकाश विठ्ठलराव,रा.माऊली निवास, संभाजी नगर, नगररोड, बालेपीर,बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.